# ॥ चैतन्य लहरी ॥



सन १९९४-९५ अंक क्र. ७ व ८

# श्री गणेश पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मला देवी यांचे भाषण

## मॉस्को : ११ सप्टेंबर ९४

श्री गणेश मूलाधार चक्रामधें आहेत - मूळाधारमधे नव्हे. मूलाधारवरच कुंडलिनी आहे जी श्री गणेशाची आई आहे. तिला आपण गौरीमाता म्हणून ओळखतो. आता आपण मानवी जाणीवेच्या अशा स्तरावर आलो आहोत जी एक नवीन चौथी आयाम आहे. श्री गणेशांच्या कृपेशिवाय हे शक्य नव्हतं.ते आपल्यामधील अबोधिततेचं प्रतीक आहेत. ही अबोधितता अनंत असल्यामुळे तिचा नाश होऊच शकत नाही, एरवी आपणच केलेल्या चुकांमुळे ती कधी कधी झाकळून जाते.पण एकदा तुम्हाला आत्म-साक्षात्कार झाला की ती पुन्हा प्रस्थापित होते, आणि तिचा आविष्कार होत राहतो. मग तुम्ही अबोधित बनून जाता, तुमचं चित्तच अबोधित बनते.

जोपर्यंत तुम्ही प्रकाशित होत नाहीत तोपर्यंत कुठलाही धर्म समजणं अशक्यच आहे - ख्रिस्तांचा, मोहम्मद साहेबांचा किंवा ज्यूंचा. ही एकच गोष्ट त्यांना लक्षात आली नाही. कारण ते स्वतः ऊच्च कोटीतले होते. सामान्य माणसांची स्थिती काय आहे हे त्यांना माहीत नव्हते. आता अस पहा, बायबलमधे अस सांगितले आहे की तुमचा उजवा डोळा पापी झाला. गणेशांच्या विरुध्द गेला तर तो काढून टाकला पाहिजे. जेव्हां मोझेसने दहा आज्ञा सांगितल्या तेव्हां ज्यू लोकांचा समाज अगदी अवनत झाल्याचं त्यानी पाहिले, जसा तो आता पण आहे. नितीमत्ता हा शब्दच त्यांना माहित नाही. सहज मधूनच मनुष्य प्राणी निरागस बनूं शकतो. ज्यू लोकांच्या शरियत मधे असं सांगितले आहे की जर एखादा चोर ठरला तर त्याचे हात कापा, शरिराचे तुकडे - तुकडे करा. श्री गणेश हे आपल्यामधील शुध्द आत्मा आहेत आणि त्यांनी या पृथ्वीतलावर येशू ख्रिस्त हा अवतार घेतला. पण त्यांचासुध्दा अनेक प्रकारे छळ केला गेला आणि एक वेगळाच धर्म निर्माण केला गेला. हेच इतरांच्या बाबतीत झाले. खरं म्हणजे कुठल्याही धर्मग्रंथांमधे दुसऱ्या धर्माच्या विरुध्द, वेगळं असं काहीहीं सांगितलेलं नाही. उदा. महम्मद साहेबांनीसुध्दा मोझेस, ख्रिस्तांचीमाता यांचेबद्दल लिहिलं आहे. म्हणजेच त्यांनी कुठलाही नवा धर्म स्थापन केला नाही. ते सगळ्या धर्मांबद्दल जसे ते एकरुप आहेत असच सांगत होते. पण आता आपल्यामधेच असे काही लोक आहेत की ज्यांना धर्म म्हणजे परमात्म्याच्या एकाच वृक्षावर आलेली फळं आहेत ही गोष्ट पटतच नाही. त्यामुळे ते दुसऱ्या धर्माच्या लोकांशीच नव्हे तर आपल्या बांधवांशी पण भांडत आहेत. परमेश्वराच्या नावाखाली त्यांनी किती तरी लोकांना ठार केलं आहे.

अबोधिता हे एक प्रेमाचं उगमस्थान आहे. लहान मुलांना सुंदर नाचगाणी करतानां पाहून जसं तुम्हाला त्यांच्याबद्दल इतकं प्रेम वाटू लागतं तसं एखादं लहान गोड

बालक तुमच्याकडे पाहून हसु लागलं की तुम्हाला त्याच्याबद्दल अपार प्रेम वाटत! तुम्ही तुमच्यामधील या अबोधिततेचा आदर करत नसाल तर, तुम्ही कधीच दुसऱ्या कुणावर प्रेम करू शकणार नाही.

अंतःकरणांत प्रेम निर्माण झाल्याशिवाय तुम्ही सत्य जाणू शकत नाही. अडचण एवढीच असते की आपण कधी कधी निरागस माणसांवर प्रेम करायला बिचकतो किंवा त्या बाबतीत साशंक होतो. असे निष्पाप लोक कधीही त्रासदायक नसतात. मुलांना आई - वडिलांनी मारलेलं मला आवडत नाही. मुलं निरागस असल्यामुळे काही तरी चाळे करतात म्हणून त्यांना समजून घेऊन आपण त्यांच्याशी प्रेमाने वागायला हवं.

आजकाल रशियामधे पण जन्मतःच साक्षात्कारी असलेली खूप मुलं आहेत. कारण आता तुम्ही सर्वजण प्रकाशित आहात आणि बरेच संत महात्मे तुमच्या पोटी जन्माला येण्यास उत्सुक आहेत. पण आधी तुम्ही स्वतः अबोधित बनायला हवं. ज्या देशांत मुलांना प्रेम व आदर मिळत नसतो तिथे जन्म घ्यायला ते तयार नसतात. त्या देशातील जन्मसंख्या कमीच असते. पण भारतासारख्या देशांमध्ये, जिथे मुलांबद्दल खूप प्रेमाची भावना असते, तिथेच त्यांना जरी तो देश गरीबांचा असला तरी, जन्म हवा असतो. मुलांना पैसा आणि त्याबरोबरच्या भौतिक गोष्टी माहीतच नसतात. ती फक्त प्रेम जाणूं शकतात. तुमच्या हृदयांत खऱ्या प्रेमाची भावना नसेल तर तुमच्यामध्ये श्री गणेश जागृत होणार नाहीत.

मुलांबद्दल आईला प्रेम वाटत असेल तर त्यांच्याकरता कराव्या लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीमधून तिला आनंदच मिळतो. असं प्रेम ज्या आईला वाटत नसेल तिला हे फार कराव लागत अस वाटत. तुम्ही तिला त्याबद्दल विचारलं तर ती म्हणेल मला हे धुवायचं आहे. ते स्वच्छ करायचं आहे. मुलाचं बघायचं आहे वगैरे वगैरे. पण आत्म्याच्या प्रकाशांत असलेली माता हे सर्व काम आवडीनं करत असते आणि त्याचा तिला आनंद पण मिळतो. तिला स्वतःच्या मुलांबद्दल आदर असतो आणि त्यामुळे मुलांकडूनही तसाच आदर ती प्राप्त करु शकते. मुलांशी कठोर शिस्तीनेच वागलं पाहिजे असं मुळीच नाही. लहान मुले फार हळुवार मनाची पण तितकीच चाणाक्ष असतात. आतां हजारांत एखादा मुलगा तसा चांगला नसेलही. पण जसजशी ती मोठी होतात तसतशी मोठ्यांच, विशेषतः आई-वडिलांच पाहून आणि आजूबाजूच्या वाईट गोष्टी पाहून ती बिघडू लागतात आणि मग त्रासदायक होतात. याचा अर्थ असा नाही की तुम्ही मुलांवर लक्ष ठेऊन त्यांना शिस्त लावयला नको किंवा त्यांना शिकवायला नको. अगदी सोपा उपाय म्हणजे तुम्ही स्वतःच अबोधित आणि धार्मिक व्हा.

श्री गणेश हे नितीमत्तेचे अधिष्ठान आहेत. ज्या समाजामध्ये नितीमत्तेला काहीच महत्त्व नाही तो समाज रसातळाला जातो. इतर आर्थिक, राजकीय व सांपत्तिक बाबतीत प्रगती झाली असली तर ते लोक आतून कळाहीन होतात. आता अमेरिकेकडे बघा, ते लोक सर्व बाजूंनी सधन आहेत, पण तिथे आज काय चाललं आहे ? बारा वर्षांची लहान पोरंही खून करतात आणि अमली पदार्थ विकतात. आणखी काही दुसऱ्या पाश्चात्य देशांत आई - वडीलच आपल्या मुलांना ठार मारतात. जे देश प्रगत व सधन आहेत तिथे तितकीच अनितीमत्ता, हे वैशिष्ट्य आहे. ते लोक दंगे - धोपे करणारे आणि उद्दाम व आढ्यतेखोर बनले आहेत. अबोधितेमध्ये अहंकार मुळापासून गळून पडतो, आणि मग तुम्ही मुलांशी बोलता, त्यांच्याशी गप्पा मारता आणि त्यांच्या चाणाक्षतेने, त्यांच्या बोलण्याने तुम्ही आश्चर्यचकीत होता. ती मुलं फार प्रेमळ व गोड असतात. श्रीगणेशांना एकदा त्यांच्या वडिलांनी सांगितलं की जो कोणी पृथ्वीप्रदक्षिणा करेल त्याला बक्षिस मिळेल. श्री गणेश मनांत म्हणाले "हा

कार्तिकेय नक्कीच पैज जिंकणार, कारण तो मोरावर बसणार आणि मोर पक्षी आहे म्हणून उडत जाणार. माझ्याजवळ काय आहे ? मी या लहानशा उंदरावर बसून जाणार". पण श्रीगणेश हे साक्षात सूज्ञपणा आहेत आणि त्या सूज्ञतेतून त्यांनी विचार केला "माझी आई ही पृथ्वीमातेपेक्षा मोठी आहे" मग त्यांनी आपल्या आईभोवतीच तीन फेऱ्या मारल्या आणि बक्षिस मिळवलं.

जो अबोधित असतो तो फार नम्र असतो. त्याला काहींच दिखाऊपणा आवडत नाही, त्याला दिखाऊपणा कसा करायचा ते माहीतच नसतं. श्रीगणेशाकडे पहा. ते लहानशा उंदरावर बसून संचार करतात. पण ज्या लोकांना असा देखावा करायचा असतो ते न परवडणाऱ्या गाड्या कर्ज काढून विकत घेतात आणि आपल्या श्रीमंतीच प्रदर्शन करतात. जे निरागस नसतात त्यांना हा एक प्रकारचा रोगच लागलेला असतो आणि त्याचाच फायदा उठवणारे लोकही जगांत असतात. पाश्चिमात्य देशांत कपडे डिझाइन करणारे लोक असतात आणि कपड्यांवर आपल्या नावांची लेबल लावतात. अशा कपड्यांना फार पैसे मोजावे लागतात, आणि आपल्या कोटांवरच हे लेबल मिरवण्याचा लोकांना सोस असतो. अशा तऱ्हेने धंदेवाईक लोक दिखाऊपणाच्या लोकांच्या प्रवृत्तीचा पुरपूर फायदा उठवितात. अबोधित माणसाला आपल्या शरिराची, फॅशनची, शरिराचे लाड करण्याची वगैरे कसलीच पर्वा नसते.

श्री गणेश हे धर्माचे अधिष्ठान आहेत. मुलांकडे बघा, ती कधी खोटं बोलत नाहीत. एवढंच नाही तर कधी कधी आपलीच कुचंबणा होईल असं बोलतात. एकदा एकाच्या आईने वडिलांना सांगीतले कि संध्याकाळी येणारा पाहुणा राक्षसासारखा जेवतो मुलाने ते ऐकलं आणि मग तो पाहुणा आल्यावर त्याच्याकडे तो जेवताना बघत राहिला. मग म्हणाला "आई, हा तर राक्षसासारखा मुळीच जेवत नाही. मग तू तसं का म्हणालीस ? असं खोटं बोलू नये". आईची खूप कुचंबणा झाली. अबोधित माणूस, त्याच्या निरागसतेतूनच इतरांची त्याच्याबद्दल होणारी टीका आणि टोमणे कमी करुन टाकतो. कारण अनितीमान माणसासारखी त्याची दृष्टीच नसते. एकदा माझ्या नातीने एक पोहण्याच्या वेष केलेली स्त्री बघितली. पाहण्यासारखी गोष्ट म्हणजे ती त्या स्त्रीला म्हणाली "तू दुसरे चांगले कपडे घालून ये नाहीतर माझी आजी तुला रागवेल". तर अशी लहान मुलं तुम्ही पाहिलीत, ती कशी वागतात, बोलतात आणि किती निरागस - निष्पाप असतात याचा अनुभव घेतलात की तुम्हाला फार आनंद होईल. ही अबोधिता प्रेम आणि आनंदाचा स्तोत्र आहे. तुमच्याजवळ असं प्रेम नसेल किंवा हा आनंद तुम्ही मिळवू शकला नाहीत तर मग फालतू दुसऱ्याचे दोष काढणे, दुसऱ्यावर टिका करणे अशा फालतू गोष्टींमधेच तुम्ही तुमची शक्ति आणि वेळ गमावून बसता. परवाच मी सुंदर संगीत ऐकत होते. डोळे मिटून मी त्या मधुर सुरांमधे रमून गेले होते. अगदी रंगून ऐकत होते. पण बाजूच्या काहीं बायका त्या गाणाऱ्याचा पेहराव, त्याचे हातवारे ह्याच्या बद्दलच बोलत होत्या, त्यांच सारं लक्ष या वरवरच्या गोष्टींकडे होते आणि मूळ अस्सल गोष्टीची त्यांना जाणीवच नव्हती. अबोधिता तुम्हाला मुळाकडे, अस्सल भावाकडे घेऊन जाते आणि प्रेम हे मूळच आहे. श्री गणेशांचा हा गुण आपण लक्षांत घ्यायला पाहिजे आणि तो स्वतःमध्ये आणला पाहिजे.

श्री गणेशांची अबोधिता आपल्यामधे सुप्त आहेच पण तिचा आविष्कार व्हायला हवा. मी एकदा एका सहजयोग्याच्या घरी गेले होते. तिथे पंचवीस - एक लोक जमले होते. मीटींग झाल्यावर ते सर्व लोक जाईपर्यंत मी थांबले. तो माणूस हे सर्व लोक जाईपर्यंत स्वयंपाकघरातच होता. परत आल्यावर तो म्हणाला "माताजी, हे काय केलंत ? हे सर्व लोक कुठं निघून गेले ? मी त्यांच्याकरता

स्वयंपाक तयार केला आहे". एवढं बोलून त्याच्या डोळ्यात पाणी आलं. मी त्याच्या आदरातिथ्याने व त्याच्या कनवाळु वृत्तीने अगदी भारावून गेले. असं आदरातिथ्य जेव्हां आपसूक होतं तेव्हां त्याची तुम्हाला जाणीव होत नाही. तुम्ही फक्त त्यांच्यातुन मिळणारा प्रसन्नतेचा आनंद घेता आणि त्याच्या प्रतिक्रियेची पर्वा करत नाही.

आपल्या शास्त्र - ग्रंथांमधे अशा माणसांचा उल्लेख आहे. उदा. श्रीराम. ते रानांत हिंडत होते आणि त्यांना शबरी नावांची दात पडलेली म्हातारी वनवासी स्त्री भेटली. ती रामापुढे आली आणि त्यांना बोरं खायला सांगून निष्पापपणे म्हणाली की "मी प्रत्येक बोर खाऊन बघितलं आहे, आंब्रट बोरं फेकून दिली आणि तुमच्यासाठी ही गोड बोरंच फक्त ठेवली आहेत". भारतात दुसऱ्याने उष्टं केलेलं कोणी खात नाहीत. श्रीरामांनी मात्र ती उष्टी बोरं आनंदाने खाल्ली. लक्ष्मणाला मात्र त्याचा राग आला आणि मग शबरी आपल्या हाताने रामाच्या तोंडात बोरं द्यायला लागल्यावर तर त्याचा राग अनावर झाला. श्रीराम म्हणाले "काय गोड बोरं आहेत ! इतकी मधुर बोरं मी आजपर्यंत कधी खाल्ली नव्हती". सीतेने पण ती बोरं खाल्ली आणि तिला पण आवडली. मग लक्ष्मणाने पण मागितली. शबरीजवळ आणखी बोरं होती आणि तिने ती लक्ष्मणाला दिली. त्या पण ती आवडली.

कधी कधी आपण मुलांमधे जास्त गुंतून घ्यायची चूक करतो. त्यांना आपण जास्त महत्व देतो, अबोधिता ही वाहत्या झऱ्यासारखी आहे, त्याला थांबवायचा प्रयत्न केला तर मुलं बिघडतात. त्यांच्याशी आदर ठेवला पाहिजे पण त्याचबरोबर त्यांना काहीतरी वेगळं, विशिष्ट असामान्य बनवायचा प्रयत्न करू नये. ती सर्व सारखीच असतात, काही काही वेळा त्यांच्यातलं वेगळेपण जाणवतं. पहिली गोष्ट म्हणजे ती कंटाळवाणी होत नसतात. तुम्ही अबोधित असाल तर सदैव ताजेतवाने असता. तुम्हाला सगळीकडे सौंदर्यच दिसतं. एकटे असलात तरी तुम्ही स्वत:शीच आनंदी असता. मोठी माणसंच फक्त कंटाळलेले होतात. विमानतळावर विमानाला उशीर असला तर मोठी माणसंच त्रासून जातात. पण मुलं मात्र तिथे कशा ना कशांत, कठडा, पायऱ्या वगैरे यांत रमलेली असतात. उठसूट कुठल्याही गोष्टीबद्दल काटेकोरपणे विचार करण्यांत आपलं आयुष्यं आपणंच फुकट घालवायला ती तयार नसतात. विमानतळावर मी नेहमी पहाते की मोठी माणसं फार अस्वस्थ व बेचैन होतात आणि त्याच्या उलट लहान मुलं इकडे - तिकडे बागडत असतात व बरोबरीच्या परक्या मुलांबरोबरही रमून जातात. फक्त अबोधितेतूनच तुम्ही तुमच्या सिमीत विचारांच्या पार जाऊ शकतां. पुष्कळ आई - वडिल जात - पात पाळण्यात अती कठोर असतात तर त्यांचीच मुलं दुसऱ्यांबरोबर चटकन मिसळून जातात. अबोधित माणूस हा असा असतो, तो कोणाशीही - कुठल्याही जातीच्या, वर्णाच्या वा चेहरामोहराचा - जमवून घेतो. या वरवरच्या गोष्टी त्याच्या आड येत नाहीत. मुलांचं पण या वरवरच्या गोष्टींकडे लक्ष जात नाही. ती फक्त हृदय व त्यांतील प्रेम जाणतात. प्रेमळ, निर्मळ माणूस - मग कुठल्या का जातीचा असेना - दिसला की ती त्यांच्याकडे धाव घेणारच.

अबोधितेत अहंकार पूर्ण गळून जातो. अबोधित माणूस आक्रमक वृत्तीचा नसतो, कदाचित असलीच तर ती प्रेमापोटीच असते. उदा. मुलगा म्हणेल "या मुलाला माझे कपडे कां नाही देत ?" तर तुम्ही म्हणाल "अरे वा, मी या कपड्यांकरता इतके पैसे मोजलेत आणि तू म्हणतोस ते याला देऊन टाक ?" मुलगा त्यावर म्हणतो "ठीक, मला तुम्ही पुन्हां दुकानातून आणा पण हे कपडे मी त्या मुलालाच देणार". निरागस मुलांजवळ असा अप्पलपोटेपणा नसतो. शिवाय मुलं आपापल्या वस्तु

एकमेकांबरोबर देवाण - घेवाण करायला तयार असतात. पण जर त्यांना मुळातच अशी शिकवण मिळाली की अमुक - अमुक वस्तु आपली आहे आणि ती दुसऱ्या कुणाला द्यायची नाही तर मग ती स्वार्थी, आपमतलबी बनत जातात. जीवनांत आनंद मिळवायचा सगळ्यात चांगला उपाय म्हणजे मुलांच्या संगतीत रहाणं, मुलांसारखं असणं आणि त्यांच्याबरोबरचा आनंद लुटणं. त्यातून आपली अबोधिता वृध्दिंगत होते. सहजयोगात पुष्कळ लोक अबोधित झोलेले मी पाहिले आहेत. श्री गणेश, जे तुमच्या डोक्याच्या मागच्या बाजूला महागणेश म्हणून आहेत. तुमच्या डोळ्यांवर कार्य करत असतात, डोळ्यांतील वखवख आणि पाप जणूं संपून जातात. तुमचं चित्त अबोधित झाल्यामळे डोळे काढून टाकायचे किंवा हात कापायचे आता बंद, कारण तुम्ही खरोखरच छान झालेले असता. श्री गणेशांप्रमाणे तुम्ही पण निष्पाप संत म्हणून जन्माला आला आहांत. त्या अबोधिततेचा आदर करायला शिका. त्यांतून तुम्ही चिरतरूण आणि समाधानी व्हाल.

महाराष्ट्रामध्ये आठ स्वयंभू गणेशांची स्थानें आहेत. मी महाराष्ट्रीयन लोक अबोधित असल्याचं पाहिले आहे. भारत हा फार प्राचीन देश आहे आणि या प्रांतात श्री गणेशांना मांनणारे खूप लोक आहेत म्हणून अबोधिता त्यांच्यामध्ये आहे. इथे श्री गणेशांची स्थापना करून दहा दिवसाचा उत्सव करतात. ही मुर्ती शाडूच्या मातीची बनवितात आणि दहा दिवसांनंतर समुद्रात किंवा नदीमध्ये तिचं विसर्जन करतात. पण आता ही कोका - कोला संस्कृति भारतात पण आली आहे; श्री गणेशांच्या समोर घाणेरडी, अश्लील गाणी म्हटली जातात, तसेच दारु पितात ती पण त्यांच्याच समोर. हे सर्व सार्वजनिक गणेश - मंडपामधे चालतं. मी दोनदा माझ्या भाषणामधून त्यांना बजावलं होतं की हे करू नकां, एकदा श्री गणेश रागावले की भूकंप होईल. तरीही त्यांनी ऐकलं नाही. तिसऱ्या वर्षी हे लोक श्री गणेशांच विसर्जन करून परत आले आणि रात्रभर दारु आणि नाचण्यामधें गर्क झाले. अचानक मोठा धरणीकंप झाला आणि ते सर्वजण गाडले गेले - सहजयोगी मात्र बचावले. त्या ठिकाणी सहजयोगाचं जे केन्द्र होतं त्याला भूकंपापासून काहींच इजा पोचली नाही. एवढंच नव्हे तर त्या वास्तूच्या आजूबाजूला बऱ्याच अंतरापर्यंत भूकंपाचा काहीच परिणाम झाला नाही. पण त्या वास्तुभोवती एक मोठा चर जमिनीला पडला होता आणि जे बाहेरचे लोक आपला जीव वाचवण्याकरतां या केन्द्राकडे धांवले ते सर्व या खड्ड्यातच पडून मरण पावले.

अबोधिता ही फार मोठी शक्ति आहे. जो कोणी या अबोधितेचा अपमान करतो किंवा तिचा नाश करण्याचा प्रयत्न करतो त्याला श्री गणेशांकडून फार कडक शिक्षा मिळते. जे लोक हृदयांत श्री गणेशांची पूजा करत नाहीत ते डाव्या बाजूला तरी जातील किंवा उजव्या बाजूला जातील. जे उजव्या बाजूचे होतात त्यांना बऱ्याच आजारांना तोंड द्यावे लागते जे बहुधा शारिरीक आजार असतात. जे लोक डाव्या बाजूकडे पूर्णपणे होतात त्यांना मानसिक रोग पछाडतात जे बरे होणारे नसतात. आपल्याकडे असे काही भयंकर विकृत लोक होते की संभोगामधून कुंडलिनी वर चढते असा ते प्रचार करायचे, हे तांत्रिक प्रकार झाले. हे तांत्रिकही मंदिरातसुध्दा असले घाणेरडे प्रकार करायचे. यातून त्यांनी श्री गणेशांचा फार मोठा अपमान केला आहे. त्या सर्वांचा आता नाश होत आहे. म्हणून अबोधित माणसाला तुम्ही उगीच आव्हान देऊं नका, कारण त्याच्याजवळ श्री गणेशांचे आशिर्वाद आहेत.

आत्मसाक्षात्कार झाल्यावरच तुम्ही तुमच्यामधे श्री गणेश प्रस्थापित व जागृत करुं शकतां.

परमेश्वराचे तुम्हां सर्वांना अनंत आशिर्वाद.

तुम्हाला त्रास होणारच नाही. आत्मपरीक्षण करून ह्या अनंत प्रकाशाचा तुम्हाला अनुभव आल्यावर सर्व कण्डिशनिंग नाहीसे होईल. हा अधिकार, हे स्वातंत्र्य तुमचे आहे. तुम्हाला हवा असेल तर तुम्हाला हा अनंत प्रकाश मिळेल, नाही तर हा प्रकाश पूर्णपणे नाहीसा होईल.

दुसरी अडचण म्हणजे अहंकार. एका बाजूच्या कण्डिशर्निंगमुळे, ज्याच्यावर जबाबदारीच्या जाणीवेतून नियंत्रण करता येते, अहंकार डोकावू लागल्यास तो फार तापदायक होतो. मग हा प्रकाश आगीसारखा होतो आणि त्याच्यात सहजयोगाचं निवासस्थान खाक होतं. प्रकाश हा आपल्याला प्रकाशित करण्यासाठी आहे, घरे जाळण्यासाठी नाही. एकदा अहंकार सहजयोगात शिरल्यावर तुम्ही सहजयोगाची जबाबदारी स्वतःवर समजू लागतां. या जबाबदारीमुळे तुम्ही स्वतः सहजयोगाचे मालक आहात अशी समजूत करून घेऊ नका. कारण नंतर तुम्ही हळु - हळुं उजवीकडे जायला लागता, इतके की लोकांना आश्चर्य वाटतं की हा इतका साधासुधा माणूस एकदम चिनी दुकानातील बैल कसा बनला. सहजयोगाचा अधिकार, मालकी तुमची नाही. सरकारी कर्मचारी अखेर सरकारचे नोकरच असतात, पण ते अधिकारीपणाचा आव आणतात. म्हणून सहजयोगामधे तुम्ही हे सर्व सुज्ञपणाने समजून घेतलं पाहिजे.

दुसरा भाग म्हणजे तेल हा तुमच्याजवळचा नैसर्गिक, अंगभूत आनंदाचा ठेवा आहे. करूणा ही ह्रदयापासुन व शुध्द असली पाहिजे. पुष्कळ सहजयोगी त्यांच्या लीडर्सना त्रास देणारे मी पाहिले आहेत. ते लीडरला विरोध करतात व सहजयोगाच्या कार्यात अडथळे आणतात. ते स्वतःला सहजयोगी म्हणवतात पण त्यांना समजत नाही की त्यांच्यामधे शुध्द करुणा असेल तर ते त्यांच्या लीडरचा आदर करतील, कारण त्यांचे लीडर करुणामय कार्यच करत आहेत. शुध्द करुणेचा हाव किंवा प्रलोभनाविषयी काही संबंध नाही. तुमच्या लीडरविषयी तुम्हाला अशी जवळीक वाटायला हवी आणि त्यांच्या परिश्रमाचं कौतुक वाटायला हवं. करुणा ही कधी अशुध्द असू शकत नाही. पण या करुणेचा आविष्कार इतक्या सुंदरपणे व्हायला हवा की त्या बाबतीत तुमचा कुणाला संशय यायला नको. खूप वर्षांपूर्वी मला सांगितलं गेलं की विमानतळावर "कस्टम अधिकाऱ्यांच चुंबन घेऊ नये" अशी नोटीस असायची. आजकालच्या काळांत पुरुष महिलेचं चुंबन घेऊ शकतो पण दुसऱ्या पुरुषाचं चुंबन घेऊ शकत नाही. खेळामध्ये आता गोल केल्यावरही त्या खेळाडूला अलिंगन न देता नुसतं हाताला हात लावतात. आतां तर गोल करणारा खेळाडू बेहोष होऊन काय करावं हे न सुचल्यामुळे मैदानाच्या बाहेर धावत येतात. सहजयोगी लोकांमध्ये पुरुषाने दुसऱ्या पुरुषाचं चुंबन घेणं किंवा त्याला मिठी मारणं चुकीचं नाही हे समजून घ्या, पण पुरुषांनी स्त्रीला किंवा स्त्रियांनी पुरुषाला स्पर्श करायची अजिबात जरूरी नाही. प्रेम दाखवायचं नाही हा कसला मूर्खपणा ? एखादी वयस्कर महिला लहान वयाच्या पुरुषाला किंवा एखादा पुरुष आपल्यापेक्षां वयाने बऱ्याच मोठ्या असलेल्या स्त्रीला स्पर्श करुं शकतो. करुणेमधून हळुवारपणाचा सुगंध यायला हवा. आपण करुणा कशी व्यक्त करुं शकतो ? राखीच्या बंधनात भाऊ - बहिणींचे नाते - संबंध असतात - आपण हे लक्षांत घ्यायला हवं की

हे राखीचे भावा-बहिणीमधले संबंध पैशाकरता नसतात तर प्रेमाचे, करुणेचे असतात. म्हणून राखी-बंधनाचे हे नातेच एकमेकांच्या संरक्षण करण्याच्या भावनेतून व्यक्त व्हायला हवे.

करुणेमधून मिळणारा आनंद इतका दुर्मिळ आहे की पैसा किंवा त्यासारख्या इतर बंधनापासून, जे या आनंदाला मारक असतात, दूर रहायला हवं. असा आनंद देणारी आणखी एक गोष्ट म्हणजे तुमच्या प्रेमाचं प्रतीक म्हणून दुसऱ्याला काही ना काही भेट म्हणून देत चला. तुम्ही राखी बांधली म्हणून बहिणीला भेट द्यायची आणि पत्नीला काही नाही असं करु नका. प्रेमाचा, करुणेचा हा स्त्रोत एखाद्या झाडाच्या मुळातील जीवनरस जसा प्रत्येक फांदीच्या टोकापर्यंत पसरतो तसा सगळीकडे पसरू दे.

तुम्हाला काही जिद्द असेल तर ती सहजयोगाबद्दलच असू दे म्हणजे तुम्ही नम्र व्हाल. सहजयोगातून एक निश्चित प्राप्त होण्यासारखं असेल तर जीवन आनंदमय होते. मग डोळे काढून टाकायची वा हात कापून टाकायची अजिबात जरूर नाही. वर म्हटल्याप्रमाणे तुमच्यामधे गाळणीसारखी भोकं असतील तर तुम्ही सहजयोगांत येऊंच नका. तुम्ही गाळण्यासारखेच रहा. तुम्ही जे काही मिळवलं आहे ते तुमच्या जवळंच होऊ दे.

तुम्हाला आणखी एक आनंदाबरोबरच मिळणार आहे ते म्हणजे समाधान. कदाचित एखाद्या अपघातांतून तुम्ही वाचाल आणि आश्चर्यचकित व्हाल. इतरांना पण हे समाधान मिळणार आणि तुम्हालाही. पहिल्यांदा हे थोडं सूक्ष्म असेल, त्यावेळी कुणालाही समजेल की हा एक विचार आहे, नंतर तो जणूं एक भाषा बनते. त्या सूक्ष्माला जर तुम्ही उडी मारल्यासारखे पकडून ठेवलंत तर त्याचा निश्चित अनुभव येईल, पण त्यासाठी तुम्ही चित्ताने त्याच्याशी एकाग्र व्हायला पाहिजे. तुमची चक्रं ठीक नसल्यामुळे कुंडलिनी कार्यान्वित होत नसेल तर नुसतं म्हणा "हम्, हम्, मी साक्षी आहे". यावेळी "आपण प. पू. आहांत" असं न म्हणतां नुसतं म्हणा "आपण श्री गणेश आहातं". मग तुमचे सर्व प्रश्न संपतील आणि चक्रातील अडथळे दूर होतील. त्याचबरोबर तुमचं कण्डिशनिंग सुधारुन अहंकाराचा त्रास कमी होईल. मग तुम्ही हे स्वतः मिळवलं आहे ही भावना किंवा तुम्ही काही करत आहांत ही भावनाही राहणार नाही आणि अशा तऱ्हेने तुम्ही सर्वस्वाने फक्त एक साधन बनाल. मग तुम्हाला कळेल कीं तुम्ही फक्त परमेश्वरी कार्य करत आहांत. अशा तऱ्हेने तुम्ही खऱ्या अर्थाने प्रकाशित व्हाल. आणि आंनद व शांती याचा प्रकाश व्हाल.

आज आपण सहजयोगाच्या दिव्यांनी दिवाळी साजरी करणार आहोत. मला काय बोलावं हे समजेनासं झालं आहे इतकी मी आनंदाने भारावून गेली आहे. या आनंदाच्या लहरी माझ्यातूंन ओसंडून जात आहेत. त्याला शब्दांत सांगता येत नाही. ध्यानामध्येच हा प्रकाश पडत असतो आणि त्या प्रकाशामुळेच तुम्ही शक्तिमान व्हाल.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद.

# तत्व भाग - २

## परम पुज्य श्री माताजी यांच्या हिंदी भाषणाचा अनुवाद

## निर्मला योग सप्टेंबर - ऑक्टोबर

काल मी तुम्हाला सांगितले होते की आज तत्वाबद्दल सांगेन. जेव्हा आपण एखाद्या झाडाकडे पाहतो, तेव्हां आपल्या हे लक्षांत येते की त्याचे मध्ये कोणती तरी शक्ती प्रवाहित व प्रभावित आहे की जिच्यामुळे तो वृक्ष वाढतो व पूर्णत्याच्या स्थितीला पोचतो. ही शक्ती त्याच्या मध्ये नसेल तर हे कार्य होऊ शकत नाही. पण ही शक्ती त्याने कशी मिळविली ? त्याचे तत्व, मर्म काय आहे? जे बाह्यांत दिसून येते ते झाड, त्याची फळे-फुले-पाने दिसतात; हे काही तत्व नव्हे. ते त्या सर्वापेक्षा सूक्ष्म आहे. त्या सूक्ष्माला तर आपण बघू शकत नाही. ते जर साकार असते तर दिसले असते. परंतु ते निराकार स्थिती मध्ये आहे. याचा अर्थ त्याच्यात असलेली पाणी, जरी ते वहात असले तर ते तत्व नाही. पाणीच त्या शक्तीला आपल्यातून वहात असते. म्हणजे जर पाणी तत्व आहे असे धरले तर दगडावर पाणी टाकल्याने काही झाडे उगवत नाही. तर तत्वाबद्दल हे लक्षांत घेतले पाहिजे की प्रत्येक गोष्टीचे आपले - आपले तत्व असते. पाण्याचे आपले तत्व आहे. वृक्षाचे आपले तत्व आहे. दगडाचे सुध्दा तत्व आहे. त्याच प्रमाणे मानवाचे सुध्दा आपले तत्व (Principle) आहे ज्याच्या आधारावर तो सर्व व्यवहार करीत असतो. मोठा होत असतो व त्याच्या ध्येयाची प्राप्ती होत असते.

हे तत्व एकच असू शकत नाही. जसे मी सांगीतले की जर पाण्याचे तत्वाने झाड निघत असेल तर दगडातुन ते कां येत नाही ? जर बीज जल तत्वामुळे संगोपले जात असेल तर ते पृथ्वी मातेला कां शरण जाते ? पृथ्वी माते मुळेच जर सर्व कार्य होत असेल तर हा दगड आहे तो मोठा का होत नाही ? याचा अर्थ असा की अनेक तत्वामध्ये एक तत्व आहे. पण तत्वे अनेक आहेत. ही जी अनेक तत्वे आहेत. निरनिराळ्या चक्रांवर त्यांचा वास आहे. पण ती एका शरिरांत समाविष्ठ आहेत आणि एकाच दिशेने त्यांचे कार्य चालू आहे. त्यांचे ध्येय एकच आहे. आणि एकच गोष्ट त्यांना मिळवायची आहे. जस मूळाधार चक्रावर श्री गणेशाचे तत्व आहे. गणेश तत्वामुळे आपण पृथ्वीला धरून आहोत. फेकले जात नाही. पृथ्वी इतक्या जोरात फिरत आहे की जर आपल्यामध्ये गणेश तत्व नसते तर पृथ्वीवर आपण टिकलो नसतो. पृथ्वीला चिकटून राहू शकलों नसतो. कोणी म्हणेल की माताजी, पृथ्वीच्या आंत सुध्दा गणेश तत्व आहे ? ही गोष्ट खरी आहे. पृथ्वीच्या गणेश तत्वाच्या योगानेच आपण पृथ्वीला धरून आहोत. परंतु पृथ्वीचे आंत जे गणेश तत्व आहे ते पृथ्वीचा जो (axis) आहे त्यावर गणेश तत्व स्थित आहे. खरं म्हणजे (axis) वगैरे काही नाही. परंतु अस समजलं जात की ही जी शक्ती आहे ती ह्या (axis) वर सरळ रेषेवर काम करते. अगदी मधोमध ही शक्ति असते. तर हे तत्व आपल्यामध्ये कोणत्या स्वरुपात असते ? ह्या तत्वामुळे आपल्याला दिशांचे ज्ञान होते. प्राण्यामध्ये हे तत्व जास्त असते. पक्षामध्ये हे फारच जास्त असते. कारण ते अगदी भोळे जीव असतात. त्यांच्यामध्ये कपट वगैरे काही नसते. ते विचार करु शकत नाहीत, त्यांच्यामध्ये विचार करण्याची शक्ति नाही. ते पुढचा विचार करु शकत नाहीत मागचाही नाही. समोर जे येईल त्याच्यावर ते काम चालवतात. मागच्या गोष्टींचा ते अजिबात विचार करत नाहीत. तुम्हाला आश्चर्य वाटेल तुम्ही बघा की एखादे माकड जोपर्यंत मरत नाही तोपर्यंत इतर माकडें आरडा ओरडा करतात. परंतु जसं ते मरेल तसे त्याला ते

सोडून पळून जातात. ह्याचा अर्थ सर्व संपले. आता तो मेला याचा अर्थ एखाद्या दगडासारखा झाला त्याचा आता काही उपयोग नाही अगदी निरर्थक झाला. परंतु हळू हळू त्याला जसा अनुभव येतो तसा जरुर परिणाम होतो. जस तुम्ही वाघाला पकडण्याचा प्रयत्न केला. दोन चार वेळा त्याला जाळ्यात पकडले की मग कळते की येथे काहीतरी गडबड आहे. बऱ्याचशा गोष्टी ईश्वरानेच दिलेल्या असतात. परंतु काही तो स्वतःच शिकतो. माणसाकडून पण तो बरेच शिकतो. पण त्याच्यामध्ये परमात्म्याने दिलेल्या गोष्टी बऱ्याच आहेत. त्यामुळे त्याला स्फूर्ती येते. जसे जपान मध्ये असे पक्षी आहेत. जेव्हां ते उडतात किंवा जास्त दूर जातात तेव्हां लोकांना हे कळतं की भूकंप होणार आहे. कारण त्या पक्षांना गडगडाटीचा आवाज बराच आधी ऐकू येतो. जनावरांना सुध्दा आवाज माणासापेक्षा जास्त आधी ऐकू येतो. त्यांचेकडे ऐकण्याची शक्ति जास्त असते. पाहण्याची जास्त असते. जर एखादी घार उंचावरुन बघेल तर तिला लगेच लक्षांत येते की तो माणूस जिवंत आहे की मेलेला आहे. या सर्व इंद्रियांच्या आंत शक्ति आहेत. त्या प्राण्यांमध्ये माणासांपेक्षा जास्त आहेत. सर्वात मोठी शक्ति त्यांच्यामध्ये असते. जी गणेश तत्वामुथे मिळते. ती म्हणजे दिशांचे ज्ञान. कोणत्या दिशेला जावयास पाहिजे. मी कालच तुम्हाला सांगितले की पक्षी जेव्हां सेबेरियातून येतात तेव्हां या शक्तिचे योगानेच त्यांना हे समजते की ते दक्षिण दिशेला जात आहेत, की पूर्वेला की पश्चिमेला की उत्तरेला. परंतु जसे जसे गणेश तत्व कमी होत जाते तसे तसे दिशांचे ज्ञान समाप्त होत जाते. दुसरीकडे मनुष्य प्राणी जेव्हां फार विचार करु लागतो की मी हे करु का ते करु, ह्याच्यात किती फायदा होईल. ह्याच्यात पैसे गुंतवावे का न गुंतवावे अशा सारख्या निरर्थक गोष्टीमध्ये आपले चित्त वाया घालवितो तेव्हा त्यांचे दिशांचा अंदाज कमी होतो. त्याला तुम्ही एका दिशेला उभे करा आणि सांगा की तुला उत्तरेकडे जायचे आहे, थोड्या वेळात तो तुम्हाला दक्षिणेकडे जाताना दिसेल. रस्त्याचे ज्ञान त्याचेकडे रहात नाही. जर त्याला तुम्ही कुठे उभे केले आणि विचारले की रात्री पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण सूर्य नसतांना कसे शोधाल. जेव्हां अशा प्रकारे तुमचे चित्त जास्त बाहेर जाउ लागते किंवा तुम्ही दुसऱ्याच्या चलाखीमुळे फसले जाता अथवा चलाखी करून दुसऱ्याला फसवू पाहतां. दोन्ही मुळे हे होऊ शकेल. एक तर तुम्ही भयभीत असाल की कोणीतरी चलाखी करुन तुम्हाला खाऊन टाकेल. अथवा तुम्ही कोणाच्या तरी मागे लागून चलाखी करुन त्याला कसे बुडवावे ह्याचे मागे आहात. ह्या दोन्ही परिस्थितीत तुमची अबोधिता (Innocene) कमी कमी होत जाते. जेव्हा अशी परिस्थिती येते तेव्हा तुम्हाला दिशांची जाणीव होत नाही. एक साधी गोष्ट. तुम्ही रागावू नका. मी आजकाल बघते की पूर्वी मुलींमध्ये अबोधिता होती परंतु त्यांचेमध्ये सुध्दा आता ती नाही. विशेषतः दिल्ली शहरामध्ये आजकाल त्या प्रत्येक पुरुषाकडे नजर उचलून बघू लागल्या आहेत. पूर्वी फक्त पुरुषच बघत असत. आजकाल स्त्रियांनी सुध्दा हे सुरु केले आहे. आता तुम्हाला असे वाटते की ही फार साधी गोष्ट आहे. ह्यांत अस विशेष काय आहे ? अशा तऱ्हेने प्रत्येक पुरुषाकडे बघणे जरुर आहे कां ? लोक म्हणतील की माताजी शिष्टाचाराबद्दल सांगताहेत. परंतु हे फार गहन आहे. जेवढे तुम्ही बघाल तेवढे तुमचे चित्त बाहेर जाईल. जितकी तुमची दृष्टी बाहेर जाईल तितके तुमचे मूलाधारचक्र खराब होईल. बऱ्याच लोकांना ही सवय असते. प्रत्येकजाहीरात वाचण्याची की विशेषतः अशा तऱ्हेच्या गोष्टीकडे बघण्याची किंवा रस्त्यांत असलेल्या प्रत्येक गोष्टीकडे जर एखादी गोष्ट बघण्याची चुकून दिसली नाही तर मागे वळून लोक ती बघतील. बाजारांत दिसणारी प्रत्येक गोष्ट जणूं काय बघितलीच पाहिजे. हे काय आहे, ते काय आहे, वगैरे. डोळ्याचा आपल्या मूलाधार चक्रांशी फार जवळचा संबंध आहे. डोक्याच्या मागच्या बाजूस सुध्दा आपले मूलाधार चक्र आहे. त्याचा परिणाम आमल्या डोळ्यावर होतो. म्हणून जे लोक आपले डोळे इकडे तिकडे सतत फिरवित असतात त्यांना मी सूचना देऊन ठेवते की त्यांचे मूलाधार चक्र फार खराब होत जाते आणि अजब अजब प्रकारचे त्रास त्यांना सहन करावे लागतात. सर्वांत प्रथम असे होते की अशा व्यक्तिचे चित्त स्थिर रहात नाही. कारण तो आपली दिशा विसरला. इकडे तिकडे हळू हळू पहाणे हे सुध्दा दिशाभूल असण्याचे लक्षण आहे. ज्या मनुष्याला कोठे जायचे आहे हे माहित आहे तो सरळ चालतो. आपली दिशा विसरणे फक्त मनुष्यालाच शक्य आहे. जनावराला नाही कारण, त्याने दिशा विसरावी असे काहीही कारण घडत नाही. समजा एखाद्या प्राण्याने दुसऱ्या एका प्राण्याला मारुन टाकून दिले. त्याला माहित आहे की त्याने कोठे टाकून दिले आहे, त्याला त्याचा वास येईल

आणि सर्व समजून येईल की पक्षाला कोठे मारुन टाकले आहे. व बरोबर तो वेळेवर त्या जागेवर पोहोचेल, चुकणार नाही. जर तुम्हाला एखाद्या मांजराला घराबाहेर काढायचे असेल तर सात मैल दूर जावून त्याला सोडून दिले तरी सुध्दा कदाचित ते परत येईल. कुत्र्याचे तर काय सांगावे त्याने अशा तऱ्हेने वास घेऊन फिरल्यावर लगेच त्याला कळते की चोर कुठे सापडेल. आणि कुठली गोष्ट घेवून कुठे ठेवली आहे. परंतु मनुष्यामध्ये ही वास घेण्याची शक्ति सुध्दा नष्ट होऊन जाते. त्याला घाणीची दुर्गंधी होईल पण पापाची येणार नाही. त्याला तो वास समजणारच नाही. जे पाप आपल्यामध्ये बसलं आहे आणि जो महापापी माणूस आहे त्याचे शेजारी आपण उभे आहोत तरी सुध्दा त्याला घाणीची दुर्गंधी येईल. परंतु ह्या महापापी माणसाची दुर्गंधी त्याला येणार नाही. आणि तो महापापी कोणीही असो मंत्री अथवा आणखी कोणी त्याची खुशामत करण्यास ह्या व्यक्तिला काहीही वाटणार नाही. गणेश तत्व खराब झाल्याने असे म्हणावे लागेल. माणसाचे सर्व अस्तित्वच खराब होऊन जाते. कारण गणेश तत्वावर चंद्र वर्षाव करत असतो. चंद्र जेव्हां खराब होतो तेव्हा त्या मनुष्याला वेडेपणाचा (Lunacy) आजार होतो. तो वेडा होतो, वेडेपणाचे काय, वास्तविक त्याचे असे होते की, जेव्हा मनुष्य आपले डोळे भिरभिरवित ठेवतो, तेव्हां स्वतःचे चित्तावर त्याला नियंत्रण ठेवता येत नाही. अशा स्थितीत एखाद्या दुष्ट आत्मा त्याचेवर आघात करु शक तो. परदेशांतील लोकांना मी सांगीतले की, हे डोळ्याचे तुम्ही काय आरंभिले आहे ? येशूने स्वच्छ शब्दांत हे लिहून ठेवले आहे "Thou Shall not Commit adultry पण मी म्हणेन I would say "Thou Shall not have adultrous eyes".

अशा तऱ्हेने आपण आपले गणेशतत्व खराब करीत असतो. आणि ज्याचे गणेश तत्व खराब होते त्याची कुंडलिनी टिकू शकत नाही. ती पुन्हा खाली खेचली जाते. कुंडलिनी कितीही प्रयत्नांनी वर उठू दे. श्रीगणेश, एखाद्या रिळाप्रमाणे ती खाली ओढून घेतात. कुंडलिनी वर चढत नाही आणि चढली तरी खाली बसते. एखादा चोर, लबाड असू दे, परमात्म्याचे दृष्टिने फार मोठा गुन्हेगार ठरत नाही. सरकार पासून काही चोरून ठेवले, समजा एखाद्याने आपले (Income) उत्पन्न सरकार पासून लपविले, आपलीच कमाई आहे तेव्हां या बाबतीत हे ठरविणे कठीण आहे की सरकार चोर आहे की ज्याचेकडून उत्पन्ना वरील कर वसूल केला जातो तो चोर आहे. परंतु ज्याची दृष्टि स्त्रीचे बाबतीत शुध्द नाही, तो परमात्म्याचे दृष्टिने अत्यंत वाईट माणूस होय. स्वतःची पत्नी सोडून इतर सर्व स्त्रियांकडे शुध्द दृष्टिने पाहिले पाहिजे. आजकाल लोकांचा विश्वास बसत नाही. की पूर्वी लोकांचे वागणे असे होते. माझ्या बरोबरीचे सर्व लोक असेच वागताना मी बघितले. परंतु आतां पहावे तो वृध्द स्त्री-पुरुषांचा सुध्दा सत्यानाश झाला आहे. या वयांत आपल्यापेक्षा तरुण ते लोकाकडून या गोष्टी शिकले व वाया गेले. तरुण लोकापेक्षांही ते जास्त वाया गेले आहेत. कळत नाही की या लोकांना केव्हां अक्कल येणार. जेव्हा मी तरुण होते तेव्हा असा प्रश्न उद्‌भवलाच नाही. मी कोठेही एकटी जात असे. पंजाब मध्ये मी राहिले आहे. कोणाचीही अनादर करण्याची हिम्मतच नव्हती. लोकांनी फाडून खाल्ले असते. विशेषतः सरदारजी लोक, एखाद्या स्त्रीकडे वाईट नजरेनी पाहिले तर रक्तपात होण्यापर्यंत पाळी यायची. आज अशी स्थिती आली आहे की कोणाची कोणाला पर्वाच राहिली नाही. हे कशामुळे झाले? लोकांचे चित्तच ठिकाणावर नसते. पन्नास वर्षापूर्वी असे नव्हते. चाळीस वर्षापूर्वी सुध्दा नव्हते. आमच्या नजरेतील लाज-लज्जा सगळी कोठे गेली आहे ? कोणी लाज पाळा असे सांगत बसते कां ? ते सर्व अंदाजानेच होत असते. माणसांना सर्व जाणीव असे. पूर्वी लोक असे वागत असत. आता जास्त शहाणे झाले आहेत ना!

असे वागून आपण आपले गणेश तत्व घालविले आहे व त्याबरोबर सर्वच घालवून बसलो आहोत. काल तुम्ही विचारले म्हणून हे सांगितले, अन्यथा लोक रागावतील म्हणून मी कधी बोलत नाही. पण आजकालचे हे वातावरण अतिशय वाईट आहे, नुकसानकारक आहे. सर्व तऱ्हेची बेशिस्त, अनादर, दुष्टपणा, इत्यादी वाईट प्रवृत्ती आमचेमध्ये येत आहेत. अशा वागण्याने आता स्त्रिया सुध्दा जर अशा वागू लागल्या तर पुरुषांची स्थिती कशी असेल ? पुरुष तर पुरुषच आहेत. पण स्त्रियासुध्दा जगांत असे वागू लागल्या तर परमात्म्याचे राज्य येणे फार अवघड आहे. आज काल ह्या जगांत गुरु सुध्दा असे झाले आहेत की ते शिकवितात की असे धंदे करा म्हणजे परमेश्वर मिळेल. लोकांच्या अशा

वागण्यामुळे ते अशा गुरुंच्या हातात सापडतात व त्यांना फावते ह्या ठिकाणी जितके लोक बसले आहेत.त्याच्या दहापट जास्ती गुरु लोकांकडे जातील.मी सांगते त्या गोष्टी कोणालाही आवडत नाहीत, मग तुम्हाला जे करावयाचे आहे ते करा तुमचे गणेश तत्व नष्ट करा आणि तुमच्यातील श्री गणेश झोपतील कुंडलिनी तत्व हे काही विज्ञानाचा विषय नाही. तो पावित्र्याचा विषय आहे. पवित्र वृत्तीचे (Holiness) लोक मला म्हणतात.पण जेव्हा मी (her holiness) पावित्र्याबद्दल सांगते तेव्हा त्यांच्या लक्षातच येत नाही की ह्या दिवसात कोणताच गुरु पवित्र व्हायला सांगत नाही.आणि माताजी मात्र अजब आहेत आणि सुरुवातीलाच त्या सांगतात की तुम्हांला पावित्र्य राखले पाहिजे. बहूतेक गुरु असेच सांगतात की तुम्हाला हवे ते करा फक्त पैसा येथे आणून द्या. ते एवढेच बघतात की तुम्ही पैसा दिला की नाही. कुंडलिनी जागृती एक सत्य Reality आहे. वास्तविकता (Actualisation) आहे. त्याच्याकरता मनुष्याने पवित्र असणे आवश्यक आहे. जर तुम्ही पवित्र नसाल तर तुम्हांस कुंडलिनी जागृतिचा अधिकार मिळू नये. तरी सुध्दा आईच्या नात्याने आपला मुलगा इतका वाया गेलेला आहे हे आईला पटतच नाही, तिच्याकरिता सर्वच अवघड होऊन बसते. कारण तिला ते सर्व लांच्छनास्पद वाटते. म्हणून, आपली सारी पुण्याई पणाला लावून हे सांगते की पूजा वगैरे करत जा.तुम्हांला आवडो अथवा न आवडो पण तुम्हांला हे लक्षात घेतले पाहिजे की पार झाल्यानंतर तुमच्या जीवनांत पावित्र्य आणणे आवश्यक आहे.ह्याचा अर्थ असा नाही की तुम्ही संन्यासी बनावे. संन्याशांना सहजयोग अजिबात मिळणार नाही.माझ्या सांगण्याचा उद्देश असा नाही की तुम्ही अनैसर्गिकपणाने रहा.त्यामुळे मनुष्य फार शुष्क होऊन जातो. ते सुध्दा चालणार नाही. सहजयोगात मंगलमय वैवाहिक जीवनाला आशिर्वाद आहेत.सहजयोगात सुध्दा विवाह होतात आणि ते बहुतेक सर्व लाभदायी झाले आहेत.आमच्या येथे सहजयोगातर्फे विवाह होतात व त्यामुळे फारच लाभ होतो. विवाह एक मंगलमय कार्य आहे.आणि तुम्हांला माहित आहे की त्या मध्ये आपण श्री.गणेशाची स्तुती करतो.जर तुमच्या मध्ये पावित्र्य नसेल तर तुम्ही परमात्म्याबद्दल बोलू शकत नाही.म्हणून बरेच लोक विचारतात की माताजी आमच्या कर्म फळाचे काय होणार आणि आमचे कर्म चांगले आहे. कां नाही? माझ्यासमोर अशा गोष्टी अजिबात करावयाच्या नाहीत.कारण आईकरिता कोणतेही काम अवघड नाही.तिची नावेंच आहेत पापनाशिनी वगैरे, तर मग अवघड काय आहे? परंतु पार झाल्यानंतर हे लक्षांत ठेवले पाहिजे, की सर्व गुन्हे पार होईपर्यंतच माफ आहेत कारण तुम्ही पार झाला नव्हतां आणि अंध:कारातच होता.काहीही असो पण त्यानंतर मात्र हे लक्षांत ठेवले पाहिजे. की आपल्या गणेश तत्वाला तुम्ही सहजरित्या जागृत करू शकतां. जर हे पाश्चिमात्य लोक टिकून राहिले आहेत तर तुम्ही कां नाही टिकणार? जर ह्या लोकांनी सुध्दा पावित्र्य म्हणजे काय हे शिकून घेतले आहे तर तुम्ही भारतीय लोक शिकणार नाही काय ? अजून तरी मला एक सुध्दा भारतीय माणूस असा भेटला नाही.की ज्याला अपवित्र होणे आवडते. ते तसे वागतात पण हे लक्षातही ठेवतात की ते चुकीचे आहे.तो गुन्हा आहे.कोणताही भारतीय असो परदेशात राहणाराही असो तो वागतो पण हे लक्षांत ठेवतो की ते चुकीचे वागणे आहे. परंतु ह्या बिचाऱ्यांना ते चुकीचे वागतात हे माहित सुध्दा नसते. त्यांना वाटते की ते फार चांगले काम करत आहेत.आणि ते म्हणतात सुध्दा की असे वागलेच पाहिजे कारण त्या शिवाय त्यांचे कल्याण नाही. इतके ते मूर्ख आहेत या बाबतीत म्हणजे अगदी साधे भोळे आहेत. तरी सुद्धा ते वाचले. तुम्ही ठीक व्हाल. परंतु तुमच्यावर जबाबदारी आहे. गणेश तत्वाला, जसे श्री. गणेश आहेत, तसे जोपासले पाहिजे. मूलाधार चक्र कोठे आहे ते पहा. जेथे उत्सर्जन होते त्या स्थानावर श्री गणेशांची स्थापना केली आहे. ते सर्व काम श्री गणेश करतात. जसे चिखलांत कमळ असते तसे श्री गणेश आहेत. आपल्या सुगंधाने ते सौरभ इतके पसरवितात कीं चिखल सुद्धा सुगंधमय होऊन जातो. तुम्हाला आश्चर्य वाटेल जसे तुमचे गणेश तत्व प्रस्थापित होऊ लागेल तसा तुम्ही कधी अनुभव घेतला नसेल की कल्पना केली नसेल इतका आनंद तुमच्या आत तुम्हाला होऊ लागतो कारण ह्याचे तत्व निर्मल आहे. त्या तत्वाचा अर्थच निर्मलता आहे. जी गोष्ट निर्मल आहे. म्हणजे तत्वामध्ये त्याचा सर्व मळ निघून जातो. आणि तेच निर्मळ असू शकते की जे आपल्या मध्ये कोणताही मळ राहू देत नाही. जे निर्मळ करते ते तत्वच असते कारण तत्वाला कोणतीच गोष्ट चिकटू शकत नाही. कायम ते तत्वच रहाते म्हणून, सर्वात प्रथम आपण गणेशाचे आवाहन करतो आणि त्यांची भक्ती करतो. परंतु सध्या असे लोक आले आहेत की,

कुंडलिनीच्या नावाखाली श्री गणेशाचा सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत अपमान करीत असतात. इतका अपमान करतात की, मी ते सांगू शकत नाही. कुंडलीनी त्यांची आई आहे आणि ती ही कुमारी स्वरुपात कन्या स्थितीमध्ये जेव्हा पतीचे स्वागत करण्याची वेळ आली ती आंघोळीस गेली होती म्हणजे त्यांचा विवाह झाला होता परंतु पतीची भेट झाली नव्हती. तर जेव्हा ती आंघोळीला गेली होती तेव्हा त्यांनी श्री गणेशाला निर्माण करुन नहाणी घराचे बाहेर ठेवून दिले. ही खरी गोष्ट आहे. दुसऱ्या अर्थात किंवा दुसऱ्या (Dimention) मध्ये असे की, त्याने आपल्या आईचे रक्षण करावे तिच्या प्रतिष्ठेचे रक्षण करावे. कारण ती Virgin कुमारी आहे. अशा प्रकारे आपल्यामध्ये जी गौरी स्वरुपा कुंडलीनी आहे. ती अजून Virgin आहे. त्याचे त्यांच्या पतीबरोबर अजून मिलन झालेले नाही. त्याचे पती आत्मा स्वरुप शिव आहेत. आणि त्या दरवाजापाशी श्री गणेश बसलेले आहेत.त्या दरवाजा मधून श्री. शंकर सुद्धा आत जाऊ शकत नाहीत इतका तो पवित्र दरवाजा आहे. आणि हे दुष्ट लोक, त्यांना मांत्रीकाकडून म्हटले पाहिजे, कुंडलिनी मातेच्याकडे त्या बाजूने जाण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे त्यांना प्रत्येक प्रकारचा त्रास होतो. ज्या माणसामध्ये पावित्र्य नाही. त्याला कुंडलिनी जागृत करण्याचा आधिकार नाही. जर अशी व्यक्ती प्रयत्न करेल तर गणेश त्यांच्यावर नाराज होतील. आणि परिणामतः त्यांच्यामध्ये अनेक प्रकारच्या विकृती निर्माण होतील. मी ऐकले आहे की, काही लोक ओरडू लागतात काही नाचू लागतात काही भ्रमिष्ठा सारखे वागतात. आणि काही जनावरासारखे आवाज करतात. मी पाहिले आहे. काहींचे अंगावर फोड येतात. कारण अशा अपवित्र लोकांचे कडे गेल्यामुळे की, जे अपवित्र आहेत आणि जे कुंडलीनीला चुकीच्या मार्गाने व चुकीच्या रस्त्याने जागृत करण्याचा प्रयत्न करतात, त्याचेवर स्वतः साक्षात श्री गणेश रागावतात.त्या साधकाला फार त्रास होतो. सर्व तांत्रिक शास्त्र श्री गणेशांना नाराज करून मिळवतात. ज्यांना लोक तांत्रिक समजतात ते खरे तांत्रिक नाहीत. खरे खरे निर्मला तंत्र, हा सहज योग आहे. कारण तंत्र म्हणजे कुंडलिनी, यंत्र म्हणजे कुंडलिनी आणि ते शास्त्र फक्त सहज योगातच शिकता येते. बाकी जे तांत्रीक आहेत, ते परमात्म्याच्या विरोधी आहेत. देवीला, श्री गणेशांना नाराज करुन, त्यांचे समोर व्यभिचार करुन, असे वातावरण तयार करतात की जेथे ते आपली दुष्कृत्यें करू शकतात. जेथे ते स्मशान विद्या, भूत विद्या वगैरेचे खेळ करून लोकांना भ्रमांत पाडतात. हे लक्षात ठेवले पाहिजे की, ज्यांचे गणेशतत्व ठीक आहे. त्यांचेवर कोणताही तांत्रीक हात उचलू शकत नाही, मग त्याने कितीही प्रयत्न करु दे. ज्यांचे गणेश तत्व ठीक आहे त्यांचे केसाला सुद्धा कोणी धक्का लावणार नाही. म्हणून जे काही गणेश तत्व आहे, ते संरक्षणाचे तत्व आहे.

सर्वात जास्त संरक्षण गणेश तत्वामुळे होते. म्हणून आपल्या गणेश तत्वाला फारच संभाळून ठेवले पाहिजे. प्रथम आपली नजर खाली ठेवा. लक्ष्मणा सारखे व्हा आणि आपली नजर सीतेच्या चरणावरच ठेवा. त्यांच्यात काही पाप नव्हते. पण त्यांना हे ज्ञात होते की, नजर वर उचलून बघणे म्हणजे आपले चित्त बिघडविणे आहे. म्हणून त्यांनी चरणाकडेच दृष्टी ठेवली गणेश तत्त्व आपल्याला पृथ्वी मातेकडून मिळाले आहे. धरणी मातेने आपल्याला गणेश तत्व दिले आहे. म्हणून आपण पृथ्वीचे अनेक आभार मानू या, कारण त्यांनी हे तत्व देऊन आम्हाला दिशाचे ज्ञान दिले आहे. जेव्हा मनुष्यामध्ये गणेश तत्व जागृत होते, तेव्हा त्याचे मध्ये विवेक बुद्धी येते. म्हणून श्री गणेशांना आपण प्रार्थना करतो की आम्हांला विवेक द्या, सद्बुद्धि द्या. मनुष्यांमध्ये जर दिशाचे ज्ञान असेल तर फारसे बिघडणार नाही. पण त्याला चांगले वाइटाचे ज्ञान असणे आवश्यक आहे, म्हणून आपण त्यांचेकडे विवेकाची मागणी करतो, म्हणून त्यांना विवेक देणारे म्हणतात, हेच गणेश तत्व आहे.

आता आपले मध्ये दुसरे जे महत्त्वाचे तत्त्व आहे ते म्हणजे विष्णू तत्व होय विष्णू तत्वामुळे आमचेमध्ये धर्माची धारणा होते, जो आपल्यामध्ये असलेल्या नाभी चक्रातून प्रभावित होतो. आपल्या भोवती नाभी मध्ये धर्म असतो. जेव्हा तुम्ही आमीबा होता तेव्हा आपले अन्न शोधत होता. त्यांच्या पेक्षा उच्च दशेत आल्यावर मानवी अवस्थेत आल्यावर स्वतःच्या सत्तेच्या शोधात असता व त्याच्या वरच्या स्थितीत ईश्वराला शोधता. तुमच्या मधला धर्म हा की, तुम्ही ईश्वराला शोधा हा मनुष्य धर्म आहे. फक्त मानवच परमात्म्याला शोधत असतो प्राणी नाहीत. हा मनुष्याचा धर्म आहे. याचे दहा धर्म आहेत, व हे दहा धर्म आपल्याला श्री

विष्णू पासुन मिळतात. श्री विष्णूकडून आपणास अनेक लाभ होतात. परंतु हे सत्य नाही. की त्यांचे कडून आपणास फक्त पैसाच मिळतो. अशा चुकीच्या कल्पना आपल्या मनात घर धरुन बसल्या आहेत की, विष्णूकडून आपल्याला क्षेम मिळते. व बाकी त्यांत काही अर्थ नाही. विचार करा की, फक्त क्षेमाने काय फायदा होतो. जेव्हा मनुष्याला क्षेम मिळते, समता, एक स्थिती ह्या, एक मासा आहे. त्याच्या लक्षात आले की, समुद्रामुळे आपणसंतुष्ट आहोत, व त्यामुळे त्याला समाधान मिळते. तेव्हा असा विचार येतो की, समुद्र तर आपण पाहिला त्याचा धर्म आपल्याला समजला समुद्राचा धर्म आपल्याला समजला. आता हे जमीनीचा धर्म काय आहे. ते बघायचे आहे. तेव्हा तो पुढे होते. मत्स्यावतार जो झाला तो ह्या साठीच एक मासा समुद्रातून बाहेर आला. तेव्हा तो मासा बाहेर आला फक्त एकच मासा जो प्रथमच बाहेर आला त्याला आपण अवतार मानतो. जो पहिल्यांदा बाहेर आला व आपल्या बरोबर इतर माशांना बाहेर आणले. काय शिकण्यासाठी? की धर्म काय आहे कोणता धर्म? जमीनीचा धर्म काय आहे? म्हणून ते मासे बाहेर आले. त्यांच्यात आता दुसरा धर्म शिकण्याची इच्छा निर्माण झाली. आधी पाण्याचा धर्म शिकले व नंतर जमिनीचा धर्म शिकू लागले. जेव्हा जमिनीचा धर्म शिकू लागले तेव्हा सरपटतांना त्यांना असे समजले की, जमिनीवर वृक्ष आहेत व वृक्षांची पाने सुद्धा आपण खाऊ शकतो. सर्वात प्रथम भूक असते व त्याचेसाठी मनुष्य शोधात असतो. शोधण्याची शक्ती सर्वात प्रथम नाभीमध्यें असते कारण तेथे भूक असते.

प्राणी झाल्यावर त्याला वाटले की, मान वर करून चालावे फार मान झुकवून चाललो आता. वर करुन चालावे. जेव्हा त्याने वर उचलली तेव्हा मनुष्य बनला. हळू हळू तो माणूस बनला. तर आपल्या आत धर्म आहेत. व आपण धर्म धारण करीत असतो. प्रथम माशाचा धर्म होता. व त्यामुळे तो पाण्यांत पोहत होता. नंतर कासवाचा धर्म होता की, तो जमीनीवर सरपटत होता. नंतर जे प्राणी आले त्यांचा धर्म होता की चार पायाने चालावे पण त्यांची मान झुकलेली असे. नंतर घोड्या सारखी त्यांनी मान वर उचलली. व त्यानंतर सर्व शरिरच उभे केले व मागचे दोन पायावर ते उभे राहिले. हा मनुष्याचा धर्म आहे. की, तो दोन पायावर उभा आहे. व त्याची मान सरळ आहे. हे तर बाह्योंत आले. अतिशय स्थूल स्वरुप, व तुम्हाला ते कळले. परंतु तत्वाचे बाबतीत कोणतेही काम जेव्हा माणूस करतो तेव्हा त्याचे कार्य तत्वाने उजळून निघाले पाहिजे. समजा आपण येथे बोलतो आहोत (Microphone) याचे माध्यमातून व आम्ही काय बोलत आहोत. ते तुम्हाला कळते आहे. पण या पेक्षाही जास्त चांगली गोष्ट आली तर ती यंत्रणा जी काम करित असेल, नवीनच असेल. तसेच माणसामधील जे तत्व आहे ते एक नविन विकसित तत्व आहे. आणि ते तत्व जे आहे ते परमात्म्याला शोधणे. त्यांचेच ते तत्व असल्यामुळे तो ईश्वराला शोधत असतो. म्हणून मनुष्याचे प्रथम तत्व आहे की, परमेश्वराला शोधणे जो मनुष्य परमेश्वराला शोधत नाही तो पशु पेक्षांही खालचा आहे, मनुष्य जेव्हा परमेश्वराला शोधण्यास निघाला तेव्हा त्याचे नाभी चक्रातील तत्व पूर्ण झाले. आता तो पुढच्या तत्वावर आला. जेव्हा तो परमात्म्याला शोधू लागला तेव्हा त्याने बघितले की, जगात सर्व सृष्टी बहरलेली आहे. कदाचित ह्या ग्रहांवर ताऱ्यांवर आणि सर्व ठिकाणी ईश्वर असेल. त्याचेकडे त्याची दृष्टी गेली. तेव्हा त्याला हिरण्य गर्भाची स्मृति आली. त्यानी वेद लिहिले त्याचे चित्त अग्नी वगैरे पाच तत्वाकडे गेले त्यांना समजून घेण्याचा त्याने प्रयत्न केला. ते समजावून घेतल्यावर हवन वगैरे केले आणि ब्रम्हदेव, सरस्वतीची पूजा केली. हे सर्व झाल्यावर त्यांना वाटले की, आता, हे सर्व ज्ञान मिळाले. जसं विज्ञानामध्ये लोकांना सर्वच समजले, बरेच काही समजले. पण जेव्हा विज्ञानाचा परिणाम समजला तेव्हा ते म्हणाले की, हे काय आपण तर अणूबाँब बनविला. आता हे विज्ञानवाले लोक अशा ठिकाणी उभे आहेत की, येथून पुढे गेल्यास खाईच आहे. ह्या पुढे एक पाऊल जरी गेले तरी एक क्षणात सर्व जग नष्ट होईल. आता, त्यांनी पुस्तके लिहिली आहेत. ती तुम्ही बघितलीस, तर एक आहे Shock ह्या विषयावर, म्हणजे केवढा मोठा धक्का आहे. आणि जगातील लोक अज्ञानांत बसून आहेत आणि म्हणून आम्ही दु:खी आहोत. जसं फ्रान्स मधील लोक नेहमी चेहरे पाडून असतात. मी विचारले काय झाले तर हे लोक म्हणाले की, माताजी "ह्या लोकांना जर आपण सांगितलं की, आपण आनंदी आहोत आपणसुखी आहोत तर ते म्हणतील तुमच्या सारखा जास्त मूर्ख दुसरा नसेल. ह्या जगांत काय चालू आहे ते तुम्हांला माहित नाही. "तेव्हा मी म्हणाले असं का? कारण हे म्हणतात

की, आम्ही लिहित वाचत असतो, आणि आम्ही अशी पुस्तके वाचली आहेत आणि त्याच्या वरुन असं समजतं की, ह्या जगावर फार मोठे संकट येणार आणि आणि सारे जग नष्ट होणार आहे. माणसांनी स्वतःला एका मिनिटाच्या आत नष्ट करण्याची पूर्ण तयारी केली आहे. आणि हे फारच मोठं संकट आहे आणि तुम्ही सुखात." त्यांचा विश्वासच बसत नाही. मी म्हणाले," म्हणून हे लोक दारु पितात की, काय, कारण फारच दुःखी जीव आहेत. फारच दुःखी आहेत म्हणून चेहरा पाडतात. मग दारु कां पितात? असंही असेल की, आपले दुःख कमी करत आहे." ते म्हणाले होय हेच लक्षांत घ्या माताजी की, ते दुःख कमी करत आहोत. परंतु प्रत्येक चौकात पॅरिसच्या प्रत्येक चौकात तुम्हाला एक घाणेरडी बाई उभी असलेली दिसेल. ती कशा करिता? मी म्हणाले की, माणसाने स्वतः करिता एक नाटक रचून ठेवलेले आहे. की, मी फारच दुःखी आहे म्हणून मला दारुही प्यायला पाहिजे व पाप करायला पाहिजे. जर मी दारु प्यालो नाही तर माझे दुःख कसे हलके होईल अशा तऱ्हने मुर्खासारखे ते बडबडतात. तात्पर्य हे की, परमात्म्याचा शोध हेच जर तत्व आहे तर हे तुमच्या लक्षात येईल की, विज्ञानाच्या रस्त्याने जावून परमात्मा भेटू शकणार नाही. विज्ञानाच्या रस्त्याने जाऊन जे काही तुम्ही मिळविले आहे. जे काही ज्ञान तुम्ही मिळविले आहे. त्याने कोणालाच आनंद मिळालेला नाही. अर्थात आदी पेक्षा तुम्ही जास्त आळशी झाला अहांत हे नक्की आता तुम्हाला चालता येत नाही. इंग्लड मध्ये जर तुम्ही एखाद्या दुकानांत गेलात आणि एखाद्याला सांगितले की, दोन चार सहाचा गुणाकार कर तर ते काही त्याला येणार नाही. त्यांना कॉम्प्युटर लागलो. त्या शिवाय त्याचे चालत नाही. आणि तो जर हरविला तर त्याचे डोके गेले कामातून आधी अतिविचारामुळे त्याचे हात निरुपयोगी झाले. कोणतेही कशिदा काढण्याचे काम किंवा स्वैपाक करण्याचे काम वगैरे ते करु शकत नाहीत. आता जेव्हा त्याचे डोके जास्त चालू लागले तेव्हा यंत्र बनविले आणि त्या यंत्रात आपले डोके घातले. आता जेव्हा यंत्र आले तेव्हा डोके निरुपयोगी झाले. आता यंत्रच त्याचे सर्वस्वी झाले आहे. त्याचे शिवाय ते काहीच करु शकत नाहीत. जर तिथे वीज बंद झाली तर लोक आत्महत्या करतील. ईश्वराच्या कृपेने आपल्या येथे अजूनी ठीक आहे. वीज जाण्याची लोकांना सवय आहे. तिकडे लोक काळजीत असतात की, वीज जाते की काय, अमेरिकेत एकदा वीज गेली तर कितीतरी अपघात झाले, संकटे आली किती त्रास झाला, लोकांना जणू काही तुफान उठले. भूकंप झाल्यावर सुद्धा इतके संकट आले नसेल इतके वीज गेल्यावर आले. ते एक मोठ नाटकच झालं. इतक्या टोकापर्यंत त्यांनी स्वतःला गुलाम बनवून ठेवले आहे. आता त्यांना वाटू लागले आहे की, प्लास्टिकचे डोंगर उभे केले आहेत आणि आता ह्या प्लॅस्टीकचे काय करायचे? आता ते नष्ट कसे करायचे? ह्या मागे लागले आहेत. आणि आता डोके धरुन बसले आहेत. एखाद्या घरांत तुम्ही गेलात तर न जाणे तुम्हांला किती प्लॅस्टिकच्या गोष्टी दिसतील भारतीय लोकांना हे वेड लागत आहे. आताच मला सुद्धा ते सांगतात की, विलायतेहुन येताना नायलॉनची साडी आणा. अरे येथे इतक्या सुंदर कॉटन (सुती) च्या रेशमी साड्या मिळतात. कां तुम्हीच नायलॉनच्या साड्या नेसतां? पण आमच्या लोकांना नायलॉनचा शोक आला आहे आपल्याला प्लॅस्टिकचा शोक आहे. तिकडच्या लोकांचा विश्वास बसणार नाही इतके आपण मुर्ख आहोत. तिकडे तर लोक कॉटनला भगवान समजतात. कारण त्यांना ते मिळतच नाही. आधी त्यांनी खूप कॉटनचे कपडे बनविले.

समजा, त्यांच्या घरी दारु असते तर घरांत दहा प्रकारचे ग्लास असतील; ह्याच्या करिता एक ग्लास, त्याच्या करिता तो ग्लास आणखी कशा करिता तिसरा ग्लास वगैरे जेवायला बसतील तर एका पदार्थाला एक चमचा दुसऱ्याला दुसरा, तिसऱ्याला तिसरा. ह्या पदार्थासाठी एक प्लेट, त्या पदार्थासाठी दुसरी प्लेट आणि कशाला तरी तिसरी प्लेट. एक ताट घ्या आणि हातानी खा, पन्नास प्रकारचे ग्लास, पन्नास प्रकारचे चमचे, पन्नास प्रकारची भांडी, करायचेत काय? आतां परिस्थिती अशी आली आहे की, सर्व काही बाहेर काढले. त्यांनी पृथ्वीमातेच्या पोटात जे काही तत्व आहे ते बाहेर काढले आणि रिकामे झाले. आता कामात खातात सकाळपासून संध्याकाळी पर्यंत कागदात खातात आमचे एक नातेवाईक तिकडे अमेरिकेला गेले होते. बिचारे जुन्या वळणाचे होते. म्हणाले मी तर कंटाळलो. रोज सहल करुन, माझी तब्येत खराब झाली. जेव्हा बघावे तेव्हा प्लॅस्टीकची प्लेट नाहीतर कागदाची प्लेट त्यांच्या घरी ही परिस्थिती आहे

आणि आपण म्हणतो की, ते श्रीमंत आहेत, पैसेवाले आहेत. प्लॅस्टिकशिवाय त्याचे घरी काय आहे? प्लॅस्टिकमध्ये जेवायचे प्लॅस्टिकमध्येच रहावयाचे प्लॅस्टिकमध्ये मरायचे. त्यांच्या घरी आता अशी अवस्था आहे. हॉटेल मध्ये राहिले आणि हॉटेल मध्ये मेले ते एखाद्या भटक्या लोकांसारखे झाले आहेत. त्यांचे सगळे संपुष्टात आले आहे. इतक्या त्यांच्या चुका झाल्या आहेत. ह्या शास्त्रवाल्यांच्या कोणत्याही गोष्टीवर जर मी बोलू लागले. तर हसून हसून पोट दुखू लागेल. वैद्यकीय शास्त्रांत असे आहे, काय झाले आहे? काही नाही जरा नीट बघा. आताच एक साहेब सांगत होते की, ते ज्यांनी दात घासतात त्या टूथपेस्ट मध्ये क्लोरोफॉर्म मिसळलेला असतो. क्लोरोफॉर्म मिसळल्या मुळे लोकांना आता कॅन्सर होऊ लागला आहे. तेव्हा एकजण म्हणाला की, भारतातून नीम पेस्ट मागवा त्याच्यात क्लोरोफॉर्म नसतो. मी म्हणाले ते चांगले आहे. क्लोरोफॉर्म महाग आहे तो आम्ही काढून पाठविणार? आम्ही नाही ते घालू शकत आतां येथून वस्तू निर्यात होवू लागतील. हाताला ते लोक जो साबण लावतात त्यांच्यात काही रसायने घालतात. तो काही अस्सल साबण नसतो. थोडे दिवसांनी बघा भारतातील साबण साऱ्या जगभर पाठविला जाईल, कारण हिंदुस्तानचा साबण शुद्ध असतो. तो तत्वावर बनविला जातो. कोणत्याही कृत्रिमतेवर नाही. त्यांचे कडील सर्व कृत्रीम असते. मी कोणतीही विदेशी वस्तू वापरीत नाही. त्यांचेकडे सेंटस् असतात. त्यात तंबाखू असते. बाकी काही नाही कारण तंबाखू थोडी थोडी चढत जाते व माणूस ती वापरीत जातो. आणि त्याला वाटते की, मी फार मोठा आहे. मी तंबाखू वापरतो. त्यांचे सेंटस् तंबाखूच्या पाण्यापासून बनवितात. आपल्याकडची अत्तरे अस्सल असतात. तर त्यांच्याकडची सगळी रसायने असतात. तिकडे इतक्या कृत्रीम गोष्टी वापरतात व त्यामुळे कोणाच्या भुवया गळून पडतात, तर कोणाचे तरुणपणातच केस गळून पडतात, तर कोणाला दाढीच नसते. नंतर कळले की, हे लोक असल्या गोष्टी वापरतात त्यामुळे त्यांना हे सर्व होऊ लागले आहे. तिकडे सरदार लोकांची परिस्थिती बिकट आहे, व ते लोक जास्त दारु पिऊ लागले तर आणखी बिकट होईल.

तर सांगण्याचे तात्पर्य असे की, तत्व न जाणल्यामुळे लोक कृत्रीम गोष्टीकडे वळतात, पंचमहाभूते तत्वे मानून सुद्धा आपण जडातच अडकून बसतो कारण जडता हे काही तत्व नाही, सर्व पंचमहाभूतांचे तत्व ब्रम्ह आहे आणि आत्मा मिळविल्यावर ब्रम्ह तत्व आपल्यामधून वाहू लागते. ते तत्व सोडून आपण इतरच शोधत बसलो व जेथे तत्व बिलकूल नसून सर्व जडच आहे अशा स्तरावर येऊन पोहोचलो त्यामुळे त्या देशामध्ये अशी परिस्थिती आता आली आहे की, तेथे कोणीही खुष नाही सर्व शास्त्रे मिळविली. खुप शिकले व विद्वान बनले पण आता अशा टोकावर उभे आहेत की, एक जरी पाऊल पुढे टाकले तरी सर्व खड्यात जातील. म्हणून सर्व लोक तिकडे दुःखी आहेत, विमनस्क आहेत व इतके त्रासलेले आहेत की, फार थोडे लोक तिकडे असे आहेत की, ज्यांचे शरिराचा कोणताही भाग हालत नाही, कोणाचे डोळे फडफडतात कोणाचे नाक हलते, कोणाचे डोके वाकडे असते. शांत असे काहीही नसते. बायका नवऱ्यांना मारतात, नवरे बायकांना मारतात, मुलांना मारत असतात, आई बापांना मारतात, दर आठवड्यांत कमीत कमी दोन मुले आई बापाकडून मारली जातात, कधी ऐकलय? अगदी ठार मारतात, ही तेथील आकडे वारी आहे. अगदी नाही तरी दोन मरतातच. आणि ते सुद्धा आई - वडिलांचे हातून, तेव्हा अशा तऱ्हेची संस्कृती जेथे तयार झाली आहे. तेथे हे लक्षात घेतले पाहिजे की, त्यांना तत्व माहीत नाही. जर तत्व त्यांना ठाऊक असते तर त्यांची आज ही स्थिती नसती. कारण तत्व आनंददायी असते. आणि त्यांनी तत्वच सोडून दिले. तेव्हा ब्रम्हदेवाचे तत्व सुद्धा घालविले.

आतां आपल्या देशामध्ये आपण म्हणतो ब्रम्ह निराकार आहे व तेथे पोहोचले पाहिजे. वेदामध्ये हे लिहिले आहे ते लिहिले आहे व त्याच्याच आपण आग्रह धरुन बसतो. परंतु वेदांतच हे लिहिले आहे की वेद. म्हणजे विद म्हणजे जाणणे. जर सर्व वेद वाचून सुद्धा मनुष्याने जर 'स्व' ला जाणले नाहीतर वेदाचा उपयोग काय? हे जर खर आहे, तर प्रथम हे आहे की, वेद पठण करुन तुम्हांला आत्मज्ञान होत नाही. त्याचे पठणाने बाकी सर्व होईल पण आत्मज्ञान नाही होऊ शकत. गायत्री मंत्र आहे. सर्व लोक गायत्री जप करीत असतात. अगदी पुष्कळ करतात, पण अशा बडबडण्याने गायत्री देवी जागृत होणार आहे का? कोणाची झाली आहे कां? असे कोणी भेटले आहे कां? गायत्री जप का करायचा

ते सुद्धा तुम्हाला माहीत नाही? गायत्रीला जागृत करण्याचे आधी आपल्या आत्म्याला जागृत करणे आवश्यक आहे. गायत्री परमात्म्याची एक शांती आहे. जो पर्यंत परमात्म्याला तुम्ही जाणत नाही तो पर्यंत गायत्री जप करुन काय होणार? समजा तुमच्यावर पंतप्रधान नाराज आहेत. तेव्हा तुम्ही दुसऱ्या कोणसही प्रसन्न करुन घेतले तरी त्याचा उपयोग काय होणार? तुम्हास कोणीही वाचवू शकत नाही. जो पर्यंत तुम्हाला ईश्वर मिळत नाही तोपर्यंत या सर्व शक्ती व्यर्थ आहेत. त्याचा अर्थ एवढाच. फक्त आत्म्याच तत्व आहे. तो मिळविला जाहिजे. या शक्ति मिळवून तुम्ही परमात्मा मिळवू शकत नाही. परंतु परमेश्वर प्राप्ती नंतर या शक्तिची तत्वें तुम्हाला मिळतात. तेव्हा या शक्तिचे वर जी शक्ती आहे तिकडे आपल्याला लक्ष दिले पाहिजे. याचे वर जी शक्ति असते तिला देवी शक्ति म्हणतात. ती आपल्या हृदय चक्रांत असते. हृदय चक्राचा अर्थ हृदय नाही. हे दुसरे तत्व आहे. ज्याला हृदय चक्राचे तत्व म्हणावे लागेल. ते दवी तत्व आहे. आता आपल्यामध्ये देवी तत्व काय आहे? जेव्हा हे खराब झाल्यास नुकसान होते ते समजावून घ्या. देवी तत्वामुळे आमचे मध्ये सुरक्षितपणा प्रस्थापित होतो या तत्वामुळे आपण सुरक्षित होतो. मूल १२ वर्षांचे होईपर्यंत देवी तत्वामुळे, आपल्या sternum मध्ये (छातीच्या मधोमध असलेले हाड) सैनिक बनतात, त्यांना Anti bodies असे म्हणतात. व त्या सर्व शरिरभर पसरतात. व तुमचेवर कोणताही हल्ला आल्यास (रोगाचा) त्याला थांबविण्यासाठी तयार रहातात. एखाद्या व्यक्तिच्या सुरक्षितपणाचे भावनेवर काही कारणामुळे परिणाम झाल्यास हे चक्र पकडले जाते. काही दिवसापूर्वीचे मी सांगितले होते की, स्त्रियांमध्ये अनेक कारणामुळे सुरक्षितपणाची भावना फार लवकर कमी होते, जसे एक स्त्री चांगली सद्‌गुणी आहे. पण तिच्या पतीने तिचे संरक्षण केले नाही किंवा तिच्या पतीवर संशय आले किंवा तो दुसऱ्या स्त्री बरोबर संबंध ठेवीत आहे, तर तिचे हे चक्र पकडले जाते, अशा वेळी पुरुषाने तिला रागाविण्याऐवजी तिचे हे चक्र ठीक केले पाहिजे, व त्यासाठी तिला हे समजाविले पाहिजे की तुझ्याशिवाय मला दुसरे जास्त प्रिय काही नाही. त्याने कशा प्रकारे पत्नीला सुरक्षित वाटेल याचा विचार केला पाहिजे. तिचेवर रागावता कामा नये तो जर तिला म्हणू लागला की तू कोण विचारणार तू फारच संशयी आहेस, जा आपल्या वडिलांच्या घरी, तर तिचा सुरक्षितपणा संपला. नवऱ्याला विशेषतः भारतातील नवऱ्यांना असे वाटते की, त्यांनी काहीही केले तरी ठीकच आहे. ते कधी पाप करीत नाहीत सर्व पवित्र्याचा ठेका स्त्रियानीच घेतला आहे. पुरुषांना त्यांची काही आवश्यकता नाही. आपल्याकडे पुरुषांचा साधारणपणे असा विचार असतो. याचा इलाज करण्याच्या सुद्धा काही पद्धती आहेत. इंग्लडमध्ये तुम्ही जा, तेथे सर्व नवरे हमाल झाले आहेत हमाल! सकाळपासून संध्याकाळपर्यंत गाढवासारखे काम करतात. घरी आल्यावर बायकोने जर घटस्फोट घेतला तर त्याचे घरादाराची विक्री होते. अर्धी मालमत्ता पत्नीची बनते. एखाद्या पुरुषाने जर दोन-तीन वेळा असे केले अथवा त्याचे बाबतीत असे झाले, तर तो अगदी रस्त्यावर येतो. तो दारु पिऊन मरणार व त्याची बायको दोन-तीन लग्ने करुन खूप श्रीमंत होणार तेव्हा हा जो बाह्यातील उपाय तत्वमधून नाही तर बाह्यातून होतो, तेव्हा पुरुष बिचारे, तुमचा विश्वास बसणार नाही पण पुरुष बायकांचे मागे मागे फिरत असतात. ती नवऱ्याला हुकूम सोडत असते. (भांडी घासा, अशी भांडी घासतात कां? केर काढा, कसा काढायचा केर। तुमच्या आईने शिकविले नाही का तुम्हाला। आश्चर्य वाटते पण मी डोळ्यांनी बघितले आहे. त्याला अंथरुणे काढावी लागतात. सर्व स्वच्छता करावी लागते. चार माणसामधून सुद्धा त्याला उठवून काम करायला लावले जाते. थोडेसी जरी अस्वच्छ झाले तरी त्याला उठवून साफ करावयास सांगतात. म्हणून विलायतेमध्ये स्वैपाक घर फारच विकसीत झाले आहे. कारण पुरुषांना सांभाळावे लागते. येथे चुली समोर बसावे लागले म्हणजे कळेल. आपल्याकडे पुरुषांना काहीही काम करतां येत नाही. कोणतेही काम असो त्यांना वाटते काय जरुर आहे काम करण्याची? एखादी वस्तू दुरुस्त करायचे असेल अथवा दुसरे काही काम असो. त्यांना त्याचेशी काहीही कर्तव्य नाही. परदेशात गेल्यावर त्यांना कळते त्यांना स्वैपाक करता येत नाही. भांडी धुता येत नाही. केर काढता येत नाही काहीच करता येत नाही व तिकडे नोकर मिळत नाही. विशेषतः विद्यार्थ्यांचे फार अडते, कारण त्यांचे हात खराब होतात. मग म्हणतात आईची फार आठवण येते, कारण येथे आम्हाला चांगले खावयास मिळत नाही. मी विचारले की स्वतः का बनवत नाही, तर म्हणाले की, आम्हाला काहीच येत नाही. पुरुष झाले म्हणजे आळशी

बनले आहेत. त्यांना काही करायचे नाही नुकतेच एक मोठे Secretary साहेब भेटले. शिक्षण खात्याचे सचिव. त्यांचे बोलणे ऐकून मोठे आश्चर्य वाटले. ते म्हणाले दहा वर्षांत भारतात सर्व ठिकाणी स्त्रीया दिसतील व पुरुष सगळे झाडू मारायला लागतील. मी विचारले का? तेव्हा ते म्हणाले की, विद्यार्थी म्हणजे मुले इतकी आळशी आहेत व त्यांचे नेते गुंडगिरी करतात. दहा-दहा वर्ष एका वर्गात बसतात. मी म्हणाले म्हणूनच आपल्या देशात असे दृश्य दिसते आहे व मुलीमध्ये मात्र स्वभावनेने चांगली आहेत जिच्याकडे काही विवेक आहे अशी मुलगी नेता होते. मुलींना काही समजावून सांगा, त्या समजावून घेतील. मुलांना सांगा ते काठ्या घेवून तयार आहेत। व त्यांचे नेते इतके वाईट आहेत की, त्यांचेशी बोलणे शक्यच नाही मुलींना दिवसभर सासरी कसे वागायचे ते शिकवायचे व मुलांना सांगायचे की सासूरवाडीला गेलास तर मोटार जरुर माग. अशा तऱ्हेने कोणत्याही व्यवस्थेमध्ये आपण त्यामागचे तत्व काय आहे ते बघत नाही व त्याचे तत्वाप्रमाणे आपण इलाज करत नाही. व त्यामुळे आपल्यात फार मोठे दोष निर्माण होतात. म्हणून विवाहामागचे तत्व पाहिले पाहिजे. व ते म्हणजे आपली पत्नी आहे. आपल्याकडे असे सांगावे लागते, तर तिकडे पुरुषांना असुरक्षित वाटते. म्हणून तेथे स्त्रीयांचे हे चक्र जर खराब झाले तर त्यांना (Breast cancer) स्तनाचा कॅन्सर होण्याची शक्यता असते. जास्त करुन हा आजार असुरक्षित वाटल्यामुळेच होतो. तो ठीक करायचा असेल तर तिच्या नवऱ्याला सांगा की, बायकोचे नीट संरक्षण कर. पण ते माझे ऐकणार नाहीत व डॉक्टर हा आजार ठीक करु शकत नाहीत, ते सांगणार. ऑपरेशन करा, कॅन्सर आला आहे. हे कापा ते कापा नाक कापा, कान कापा, कॅन्सर झालेल्या व्यक्तिचे अर्धे अवयव कापलेलेच असणार व थोड्याशा अवयवावरच तो आपले काम चालवितो. सहज योग असा नाही. सहज योगात तत्वावर काम चालते. कोणते तत्व खराब आहे ते पहायचे व ठीक करायचे.

आता, नाभी चक्राच्या चारही बाजुला जी महान तत्वे आपल्यामध्ये आहेत, ज्यांना धर्म तत्वे म्हणावे लागेल व त्या धर्म तत्वांना सांभाळणारे जे तत्व आहे. जे त्यांचा आधार आहे. जे ज्यांना मार्गदर्शन करते, ते आहे गुरु तत्व ते गुरु तत्व जर खराब झाले तर कॅन्सरचा आजार फार लवकर होतो. कॅन्सर होण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे एखाद्या वाईट गुरुकडे जावे, पाच वर्षात कॅन्सर नाही झाला तर बघा. दहा वर्षे झाली मी त्यांची नावे सांगत आहे की, ते कसे गुरु घरात आहेत. ते तुमचे नुकसान करतील तर ते मलाच सांगतात की, माताजी तुम्ही असे म्हणू नका तुम्हाला ते गोळ्या घालतील, मी म्हणाले ज्याची हिम्मत असेल त्याने चालवावी बंदूक. त्यांची नावे सुद्धा सांगितली. पण त्यांचेकडे लोक गेले व हृदय विकार घेऊन परत आले. पण कृपा करुन हृदय विकार नाही दिला तर वेड लावले अथवा (Epilapsy) (अपस्मार) चा आजार दिला एवढ्यावरच जर त्यांचे समाधान झाले नाही तर कॅन्सर देतील कारण तुम्ही त्यांना पैसे देणार तेव्हा काही तरी त्यांनी तुम्हाला द्यायलाच हवे. इतकी त्यांची सेवा केली खिसे भरले तेव्हा काही तरी तुम्हाला मिळलेच पाहिजे गुरु तत्व खराब झाल्यावर कितीतरी प्रकारचे कॅन्सर माणसाला होतात, आपली जी मूर्धा आहे ती कोणा समोर ही चुकवायची नाही प्रत्येकासमोर डोके टेकवायची काय आवश्यकता आहे? आपल्या आई - वडिलासमोर जरुर टेकवा पण एखाद्याला गुरू मानून त्याच्यासमोर माथा टेकविण्याची जरुर नाही. जो परमात्म्याची भेट घडवील तो गुरु.

माझे यांचे उलट आहे. मी लोकांना सांगते की, माझे पाया पडू नका तर सहा हजार लोक माझे पायावर डोकी आपटतात, व व्हायब्रशन्समुळे माझे पाय सुजतात. मी सांगितले तर राग येतो. माताजी दर्शन घेऊ देत नाहीत, असे म्हणतात. लोकांना ही एक सवयच लागली आहे. कोणी श्रीमान १०८,४२० वगैरे आले की, त्यांना साष्टांग नमस्कार घालायचा व चक्कर येवून पडायचे. गुरुनी आम्हांला आशीर्वाद दिला व चक्कर येवून आम्ही पडलो व पाच दहा वर्षात वेड्याचे हॉस्पीटलमध्ये लोग हा विचारच करीत नाहीत की या माणसाने गुरु केला आहे, तर त्याची प्रकृती तरी कमीतकमी ठीक रहावी. याचे तरी बरे असावे. पण हजारो लाखों लोक त्याचे कडे जातात. "तुमचे गुरु काय करतात." सातव्या मजल्यावर बसले आहेत. बोलत नाहीत मौनी बाब आहेत ना ते." काय बोलणार? डोक्यात काही असेल तर बोलतील ते मौनी बाब आहेत. बोलणार नाहीत.

जवळ गेलात तर चिमटा मारतील चिमटयाचा मार खायला लोक शंभर रुपये देतील. कारण मौनी बाब आहेत. जितका ते देखावा करतील तेवढे चांगले प्रत्येक गुरु काही नवीन दिखावटी पणा काढतो. असे एका गुरुने सांगितले की, तुम्हांला हवेत उडायला शिकवणे. मुलांना तरी पुष्कळ समजते पण मोठ्यांचे डोक्यांत काहीच शिरत नाही. या लोकांनी तीन, तीन हजार पौंड घेतले आहेत. तीन तीन हजार विचार करा. "लोकांना उडायला शिकविणार." मी म्हणाले दुदैव लोकांना तुमच्या गुरुनांच का नाही उडवून दाखवायला सांगत? प्रथम त्यांना उडायला सांगायचे व मग पैसे द्यायचे. बिचाऱ्यांना खाण्यासाठी आधी बटाटे उकडले व उकडून त्याचे पाणी तीन दिवस प्यायला दिले. म्हणाजे उडण्यासाठी तुमचे वजन कमी करायला हवे. त्यासाठी तीन हजार पौंड म्हणजे उडण्यासाठी तुमचे वजन कमी करायला हवे. त्यासाठी तीन हजार पौंड म्हणजे जवळ जवळ साठ हजार रुपये. त्यानंतर बटाटयाच्या साली खायला दिल्या. सगळ्यांना सांगितले तुमचे वजन वाढता कामा नये. शेवटी जे सडलेले बटाटे होते ते खायला दिले त्यांना (diarrheoa) झाला तर म्हणाले हे होणे आवश्यक आहे. त्यामुळे तुमचे वजन घटले. मग थोडे दिवस उलट टांगले व तसेच ठेवले, का तर वजन घटले पाहिजे. त्यानंतर (Foam) वर ठेवले व उड्या मारायला लावले. घोडयावरुन उड्या मारतात तसे. व फोटो काढले वर्तमान पत्रांत छापून दिले. फोटो की आम्ही हवेत चालतो आहोत. अगदी खोटे साफ खोटे तुमच्या मोटारी आहेत, गाड्या आहेत, त्यातून हिंड, तुम्ही जर हवेतून असे तसे चालाल तर कोठे तरी आदळाल विचार करा, की त्याची काय आवश्यकता आहे. आता माणसाला पक्षी होण्याची आवश्यकता आहे की, काही विशेष, म्हणजे परम व्हावयास हवे. आपल्या गुरु तत्वाची दया आली पाहिजे. आपली अक्कल गहाण टाकतात व त्या मूर्खाकडे जाऊन स्वतःचे गुरु तत्व खराब करुन घेतात. एवढा सरळ विचार करित नाहीत.

एका ग्रहस्थानें विचारले "माझ्या कर्मगतीचे काय?" मी म्हणाले. " तुमचे गुरु काय म्हणतात?" म्हणाले "माझ्या गुरुने सांगितले आहे की, तुझ्या पापाचा फक्त १/६८ इतकाच भाग मी खाऊ शकतो. "मी विचारले" ते कोणत्या हिशेबाने आणि बाकी कोण खाणार? याचा अर्थ अजून सदुसष्ट गुरु तुम्हांला शोधायला हवेत. म्हणजे तुम्ही सुटणार बाकी कोण खाणार? ते कोणत्या दुकानात मिळतात? यानी तर आपला हिस्सा घेतला व दुसऱ्याची शिफारस केली. डॉक्टर लोक करतात तसे एखाद्याच्याकडे तुम्ही जावून म्हणलात की माझे डोळे खराब आहेत. तर ते म्हणनार आधी जाऊन दात तपासून घ्या. मग तुमचे सगळे दात काढून टाकतील व सांगतील की डोळे तपासून घ्या. त्याच्यात बहुतेक फोड झाला आहे. सगळे करुन झाले आणि लक्षात आले की आपल्याला काही झालेच नाही. अशी या लोकांची पद्धत आहे. ही सर्व यांची विभागणी आहे. हे म्हणाले की, आम्ही इतकेच घेतो जास्त नाही. घेत राहिलेल्या साठी त्या गुरुचे घरी जा. दुसऱ्या गुरुंने राहिलेला सर्व पैसा काढून घेतला आता असे कळते की, बिचारा पार रस्त्यावर आला आहे घर विकले बायका मुले तिसरीकडे भीक मागत आहेत.

आपण जेव्हा आपली अक्कल वापरीत नाही तेव्हा असल्या गुरुंचे घरी जात असतो. आपल्याला जर असे वाटते की, देवाच्या नावावर जे काय चालते ते देवाचेच काम असते तर ते अगदी चूक आहे. असे, आज एक बाईसाहेब तिकडे म्हणाल्या माताजी माझे गुरु फार मोठे पोचलेले गृहस्थ आहेत. यांत शंका नाही. आणि येथे बसून दिंडोरा पिटते आहे. की, मी गुरुला शरण गेले आहे. मी गुरुला शरण गेले आहे. तेव्हा मी विचारले मग काय झाले? तेव्हा म्हणाली माताजी मी पार झाले स्वतःचेच स्वतःला सर्टिफिकेट ! मग मी विचारले. "कशा पार झालात?" तर म्हणते गुरुला शरण गेल्यामुळे. मी पार झाले. "असे तर मला शरण येऊन सुद्धा होणार नाही. तुझे गुरु तर वारले. पण मी तुमच्या समोर बसली आहे. तुम्ही म्हणाला. माताजी मी तुम्हांला शरण आहे. मला पार करा. तर नाही होणार थोडे फार स्वतःचे भांडवल पण लागते व कुंडलिनी पण जागृत व्हावी लागते पार होणे आवश्यक आहे. पार होत नाही तोपर्यंत माताजी मी तुम्हांला शरण आले आहे. असे म्हणून काही उपयोग नाही. मी स्वच्छ सांगते, पार व्हावे लागते. मी शरण आलो म्हणणे सोपे आहे. पण काम मला करायचय, माझे हातून झाले पाहिजे. जोपर्यंत माझे हातून काम होत नाही, तोपर्यंत सर्व निरर्थकच आहे. मी स्पष्ट सांगते जो पार नाही तो नाही. आहे तो आहे यांत खोटे (Certificate) कोणी देऊ शकत नाही. तुम्ही माझ्याशी

भांडा, लढाई करा, काहीही करा मी काय करणार? नाही, तर नाही, झालात पार झालात. अगदी साधा सरळ हिशेब आहे. आम्ही प्रयत्न करु शकतो पण पार नाही. करु शकत. आम्ही प्रयत्न करु, प्रेम देऊ, सगळ काही करु पण पार तुमचे तुम्हांला झाले पाहिजे. जसे जेवण अगदी रुचकर जेवण मी बनविले पण तुम्हाला जर जिभ नसेल, तर मी तुम्हाला काय देणार, आणि तुम्हाला काय चव समजणार? तुमची जीभ जागृत झाली पाहिजे. तिला संवेदना झाली पाहिजे. की माताजी काय बनवून आपल्याला वाढले. तुम्हांला खाल्ले पाहिजे. का मीच तुमचे साठी खाऊ सुद्धा. तेव्हा हे जाणले पाहिजे की तत्व एकच आहे. व ते म्हणजे गुरु तुम्हांला परमात्म्याशी एकरुप करवितो जो परम मिळवून देतो तोच गुरु दुसरा कोणी गुरु नाही. सर्व आंधळे आहेत आणि एक आंधळा दुसऱ्या आंधळ्याला कोठे घेऊन जातोय ते फक्त देवच जाणे. शरणागतीने काही फरक पडत नाही. "शरणागती तर पार झाल्यावर सुरु होते. त्या पूर्वीची शरणागति काहीच नाही. तुम्ही पाहिले असेल की पार केल्याशिवाय मला कोणाला पायावर येऊ द्यायचे नसते. कारण त्यात काय अर्थ आहे. ? जर तुम्ही पारच झाला नाहीत तर मी काय करुं? प्रथम पार होणे आवश्यक आहे. हे जरूर आहे की बरेच लोक पाण्यावर आल्यावरच पार होतात. ते ही ठीक आहे. पण त्यावेळी शरणागतिची काहीच आवश्यकता नाही. त्यानंतर शरणागत झाले पाहिजे. जेव्हा शरणागत व्हायचे त्यावेळी शरण जाण्यास कमीत कमी आत्ता तर पार जावयास हवे प्रकाश तर असावयास हवे. प्रकाश असल्याशिवाय तुम्ही माझे पण पायावर येऊ नका. कदाचित मी सुद्धा १०८,४३० वगैरे असेल, कोणास ठाऊक? आणि मी असले तरी तुम्हांस कसे समजणार की मी आहे अथवा नाही? मी काहीतरी कसे समजणार? केव्हांही, जोपर्यंत पार होत नाही.तोपर्यंत तुम्ही माझे पायावर येऊ नका म्हणून तुम्हाला कोणाचेही पुढे मस्तक झुकविण्यास प्रतिबिंध केला होता. जो परमात्मा मिळवून देईल फक्त त्याचे पुढे मस्तक झुंकवा ही घटना जोपर्यंत तुमचे मध्ये घटीत होत नाही. तोपर्यंत कोणत्याही तत्व हीन गोष्टीचा स्विकार तुम्ही करू नये म्हणून आपले जे संरक्षणाचे तत्व आहे त्या बद्दल मी तुम्हाला सांगितले. उद्या आणखी काही तत्वाबद्दल सांगेन. आज फार लांबलचक चर्चा केली. एका बाबतीत आज मला फार समाधान वाटले. काल सगळे म्हणाले की, माताजी उद्या सिनेमा असल्याने (टी. व्ही.) वर कोणी येणार नाही प्रोग्रॅमला. माझे पति आज लंडनला चालले होते. पण त्यांना मी तशीच सोडून आले. विमान तळावर सोडण्यास गेले नाही. मी म्हटले काही लोक तरी नक्कीच येतील म्हणून जायला पाहिजे. म्हणून मी आले आणि म्हणून मला फार आनंद झाला की, तुम्ही तुमचा सिनेमा सोडून सुद्धा येथे आलात तुम्ही तत्वाला जास्त महत्व दिले म्हणून मी आज फार खूष आहे.

ईश्वराला कृपेने आपण आज सर्वजण पार व्हा म्हणजे उद्या फार मजा येईल. आणि उद्या सगळ्यांना घेऊन या. चित्तामध्ये Seriousness (गांभीर्य) येऊ नये म्हणून मी अतिशय हलके फुलके अशा तऱ्हेचे तुम्हांला समजाविले. पण याचा अर्थ असा नाही की, पोरकट पणाने वागले यांत गांभीर्य आहे. मला ती एक लीला आहे. ही सर्व लीला आहे. म्हणून अगदी शांत चित्ताने दोन्ही हात माझे समोर करा व चित्त अगदी मोकळे सोडा. तत्वाबद्दल मी तुम्हाला अगदी साध्या शब्दात, हलक्या फुलक्या पद्धतीने सांगितले. कारण तो अतिशय महान व गांभीर विषय आहे. व त्याची महनता व गांभीर्य तुमचेवर पसरावी, कारण महनताच मिळवायची गोष्ट आहे. ती मुळे मनुष्य दबला जात नाही वी वाहयला जात नाही. तर त्यामध्ये तो वृद्धिंगत होतो.

माझ्या मते बहुतेक सर्व लोक पार झाले आहेत. पार होते वेळी तुमच्या लक्षात येईल की हातावर थंड असा वारा जाणवतो. व आपण.निर्विचार होता स्वतःला निर्विचार ठेवण्याचा प्रयत्न करा. डोळे अगदी बंद ठेवा. थोडा वेळ आणि आनंद मिळवा. विषय गहन होता तरी सुद्धां तुम्ही पार झालात. मी आजपर्यंत तत्वाच्या विषयावर बोलले नव्हते. आज प्रथमच तत्वावर बोलले. अगदी गप्पा गोष्टी करीत तत्वाला प्राप्त करुन घेतले पाहिजे.

हा अतिशय सूक्ष्म विषय आहे म्हणून सूक्ष्मांत जाऊन बघा तुमच्या हातावर थंड थंड हवा येऊ लागेल. हेच मिळवायचे आहे. हाच जीवनाचा उद्देश आहे. या ब्रम्हत्वाला प्राप्त व्हायचे आहे. ते आत्म्याचे तत्व आहे ते आपल्या मधून लहरी सारखे, लहरी सारखे वहात आहे. ते आत्म्याचे तत्व ब्रम्ह तत्व आहे.

# मॉस्को जाहीर कार्यक्रम

## प. पू. श्री. माताजींचे भाषण

### १२ सप्टेंबर ९४

सर्वप्रथम आपण हे समजून घेतलं पाहिजे की सत्य हे फक्त सत्यच असते. आपण ते बदलू शकत नाही. ते तुम्च्यावर लादता येत नाही. तुम्ही त्याची इच्छा करायला हवी. तुम्हाला ते नको असेल तर त्याची सक्ति करतां येत नाही. सध्याची वेळ ही शेवटचा निर्णय करण्याची आहे. नरकांत जायचं असेल तर तुम्ही खुशाल जा. स्वर्गात जायचं असेल तरी तुम्ही तसं करुं शकतां. हे सर्व तुमच्या शुध्द इच्छेनुसार होणार आहे. तुमची स्वतःची इच्छा. त्रिकोणाकृति माकडहाडामध्ये तुमच्याजवळ उत्क्रांत होण्याची शक्ति आहे, तुम्हा सर्वांच्यामध्ये तिचा वास आहे, ती तुमची स्वतःची आहे; पण ही शुध्द इच्छेची शक्ती आहे. मी पुष्कळ लोक असे असलेले पाहते की त्यांना वाटतं त्यांचं सर्व काही ठीक आहे आणि ते सुखी समाधानी आहेत, त्यांना इतरांची काळजी नाही. म्हणून आपण समजून घ्यायला शिकलं पाहिजे. आपण सूज्ञ बनून समजायला हवं की आपल्याला सर्व धर्मांच्या पलीकडील सत्य मिळवण्याची जरुरी आहे व त्यासाठी आधी संतुलन मिळवायला हवं. पण लोक पैशाच्या आणि सत्तेच्या मागे लागले. हाच प्रश्न पडतो की, धर्माच्यामागे लागलो तर पदरी निराशाच येते. त्यांनी आत्म्याला जाणलं नाही. त्यांना प्रकाश मिळाला नाही. याची काळजी न केल्यामुळे लोकांचा विश्वास उडाला.

हे शास्त्रीय नाही. तुम्ही मन उघडं ठेऊन परमेश्वर आहे की नाही हे स्वतःच ओळखायला हवं. आत्मप्रकाश मिळाल्यावरच तो आहे हे तुम्हाला जाणवेल. चराचरांतून पसरलेली ही परमेश्वरी शक्ति तुमच्या मध्यवर्ति मज्जासंस्थेमधे तुम्हाला जाणवली पाहिजे. हा आत्मसाक्षात्कार तुम्हाला मिळण्याची वेळ आता आली आहे. तुम्ही स्वतःजवळची ही शक्ति वापरूनच साक्षात्कार मिळवणारं आहातं. ख्रिस्त म्हणाले होते की तुम्हाला दुसरा जन्म मिळणार आहे पण लोकांनी तिकडे लक्ष दिले नाही. म्हणून आपण पाहतो की एक धर्म पाळणारे लोकही आपसांत भांडत असतात. त्यांना दुसऱ्यांबद्दल आदर नाही, त्यांच्या लक्षांत येत नाही की पैसा व सत्तेच्या मागे लागणे हे परमेश्वरी कार्याच्या विरुध्द आहे. ज्यांना सत्य जाणून घ्यायचं आहे त्यांनी समजून घेतलं पाहिजे की पैसे मोजून ते आपल्याला मिळणार नाही. परमेश्वराला काय पैसा लागतो ? तो पैसा जाणत नाही, त्याला पैशाची पर्वा नाही. उन्नत होणे हा तुमचा अधिकार आहे, ही परमेश्वरी सर्वव्यापी शक्ति जाणणं हा तुमचा अधिकार आहे. आता ही शक्ति मिळण्याची वेळ आली आहे. पुढील मजकुर मागील पानावर

## मुखपृष्ठाचा पुढील मजकुर

ती मिळाल्यावर तुम्ही एक शक्तिशाली व्यक्तित्व बनणार आहांत. ती स्थिती फार तेजस्वी पण तितकीच करूणायुक्त असेल. तुमची इच्छा जर खरोखर शुध्द असेल तर तुम्हाला हे मिळेल, पण खोटे आव आणणारे, उध्दट, अहंकारी किंवा मूर्ख माणसांना नाही.

आपण आतां निर्णय करण्याच्या मार्गावर आहोत. प्रत्येक देशामध्ये आज अनेक समस्या आहेत. रशियातसुध्दा त्यांतून मार्ग काढण्यासाठी लोकांच परिवर्तन व्हायला हवं. हे परिवर्तन जोपर्यंत होत नाही तोपर्यंत हे प्रश्नही सुटणार नाहीत. त्यातूनच सर्व जग बदलणार आहे आणि मग प्रत्येकाचे शारीरिक, मानसिक, भावनिक प्रश्न संपणार आहेत, आणि मग तुमचं स्वतःचं, तुमच्या देशाचं आणि सर्व जगाचंच कल्याण होणार आहे. ही वेळ येऊन ठेपली आहे हे तुम्ही लक्षांत घ्यायला हवं आणि ती शक्ति कार्यान्वित झाली की हिच सर्वव्यापी शक्ति तुमच्या बोटांवर (टोकावर) जाणवणार आहे. ही स्पंदनं एकदा जाणवली की मग ही खरोखरच ती शक्ति आहे हे तुम्ही मानायला हवं. तुम्ही प्रामाणिक असाल तर त्यावर तुम्ही विश्वास ठेवाल.

मग जे काय होतं त्याने तुम्हीच आश्चर्यचकीत होता. सर्व प्रथम तुम्ही आतून अगदी शांत होता. आजूबाजूला जे काय चाललय ते एकादं नाटक चालल्यासारखं नुसतं पहाता. तुम्ही तुमच्या प्रश्नांच्या पलीकडे जातां आणि मग त्या प्रश्नाकडे त्रयस्थ दृष्टीने पाहून तुम्हीच ते सोडवू शकतां. जगांतले आजकालचे सर्व प्रश्न चक्रांची स्थिती खराब झाल्यामुळे निर्माण झाले आहेत. कारण हे प्रश्न तुम्हा मानवांनीच निर्माण केलेले आहेत. तुम्ही जर तुमची चक्र ठीक करूं शकलात तर फक्त तुमचे स्वतःचेच नाही तर दुसऱ्यांचे प्रश्नही सोडवू शकाल. तुम्हाला जेव्हां आत्मसाक्षात्कार मिळतो तेव्हां तुमचं चित्त प्रकाशित होते आणि तुमच्या मनांतून लोभ, मोह इ.पार नाहीसे होतात. तुम्ही सहजपणे सज्जन बनून जाता. कुणाला सांगायची जरूर नाही. आत्म्याच्या प्रकाशामधे योग्य काय हे तुम्ही ओळखू शकतां आणि जे काही विघातक आहे त्याचा त्याग करूं शकतां. कुंडलिनीच जागरण तुम्ही करू शकता आणि दुसऱ्यांना मदत करूं शकतां. तुम्ही स्वतःला आणि दुसऱ्यांलाही खऱ्या अर्थाने ओळखू शकतां. आणि सगळ्यांत महत्वाचे मोठे म्हणजे तुम्ही आंनदाच्या सागरा मधे उतरता. म्हणजेच तुम्ही अनिवर्णनीय परम - सुखाच्या स्थितीमध्ये येता. हा आनंद म्हणजे सुख - दुःख वगैरे प्रमाणे नाही. आपला अहंकार फुलला की आपल्याला बरं वाटतं, आणि तो उतरला (फुटला) की आपण कष्टी होतो. एकाच नाण्याच्या या दोन बाजू आहेत. पण हा आनंद अद्वितीय आहे, कारण सर्वात मोठी गोष्ट म्हणजे त्या सत्याची प्रचिती तुमच्या बोटांवर तुम्ही जाणू शकतां. एकदा तुम्हाला ही जाणीव समजली - एकदा सत्य ओळखलं - आणि सर्वांना त्याचा सारखाच अनुभव आला की मग चर्चा, वाद सारं संपून जाणार. मग भांडणं नाहीत, युध्द नाही, काही नाही, परमेश्वराच्या साम्राज्यात तुम्ही येण्याची वेळ आली आहे आणि परमेश्वर तुमचा सांभाळ करणार आहे. तुमचा त्याच्याशी संपर्क जोडला गेला पाहिजे. हा संपर्क होणे म्हणजेच योग जो अगदी सहज आहे आणि त्याची तयारी व सिध्दता तुमच्यामध्येच अंतर्भूत आहे. तुम्ही तुमचं हृदय उघडा आणि हे प्राप्त करा.